गुरूवार, १३ जून २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०३ • अंक - २८१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 13 JUNE 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-281 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# निधी वाटपात महाराष्ट्रावर पुन्हा अन्याय

## नाना पटोले : केंद्रातील भाजपा सरकारचा आकस कायम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्रातून जीएसटीसह सर्व प्रकारच्या कर संकलनातून सर्वात जास्त निधी केंद्र सरकारकडे जमा होतो पण राज्याला निधी देताना मात्र हात आखडता घेतला जातो. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यांना निधी वितरण करण्यात आले. यामध्ये भाजपाशासित उत्तर प्रदेशला सर्वात जास्त २५ हजार कोटी रुपये, मध्य प्रदेशला १० हजार ९७० कोटी, तर सरकारला पाठिंबा देणाऱ्या नितीशकुमार यांच्या बिहारला १४ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे पण महाराष्ट्राला केवळ ८ हजार कोटी रुपये देऊन तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.**

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, केंद्रातील भाजपाचे सरकार सातत्याने महाराष्ट्राला सापत्नभावाची वागणूक देत आले आहे. निधी वाटपात विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांनाही कमी निधी देण्यात आला आहे. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार आहे त्यांना ५ हजार कोटी रुपये दिले आहेत. पंजाब मध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे त्यांना २५२५ कोटी रुपये दिले आहेत. आंध्र प्रदेशातील चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षाने केंद्र सरकारला पाठिंबा दिल्याने त्यांना मात्र ५६२२ कोटी रुपयांचा भरघोस निधी देण्यात आला आहे. हा पैसा सामान्य करदात्याचा असून त्यांच्यासाठीच तो वापरला जातो पण भाजपा सरकार जाणिवपूर्वक निधी वाटपात भेदभाव करून जनतेवर अन्याय करत आहे.

राज्यात भाजपाप्रणित सरकार असतानाही केंद्राकडून जास्त निधी आणण्यात त्यांना यश आले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासमोर राज्यासाठी निधी मागण्याची हिम्मत नाही. दिल्लीतून जे मिळेल त्यातच ते समाधान मानतात हे राज्याचे दुर्दैव आहे. महाविकास आघाडीचे सरकार असतानाही केंद्रातील भाजपा सरकार जाणीवपूर्वक निधी वितरणात भेदभाव करत होते. महाराष्ट्रावर केंद्रातील भाजपा सरकार करत असलेल्या अन्यायाची नोंद महाराष्ट्रातील जनता घेईल व लोकसभा निवडणुकीत ज्यापद्धतीने त्यांना जागा दाखवली तशीच विधानसभा निवडणुकीतही दाखवतील, असेही नाना पटोले म्हणाले.

# मला राज्य सरकार बदलायचे आहे : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सरकारला अनुदान द्यावेच लागेल, नाही दिले तर रस्त्यावर उतरायला लागेल. चार सहा महिने थांबा मला राज्य सरकार बदलायचे आहे. निर्णय घेण्याचा अधिकार तुमच्या हातात द्यायचा आहे. त्यासाठी तुमची साथ हवी आहे. लोकसभेला साथ दिली त्याबद्दल आभार, असे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले. शरद पवारांनी बारामतीतील वकिल, डॉक्टर यांच्याशी संवाद साधत त्यांचे प्रश्न समजून घेतले होते. बुधवारी त्यांनी बारामतीतील शेतकऱ्यांची संवाद साधला आहे. शरद पवार म्हणाले, नियमित पाणी आहे, ते मिळायला पाहिजे. माझा दोन एकरचा भाग मंजूर आहे आणि सहा एकरचे पाणी घेतो, हा उद्योग थांबल्याशिवाय तुम्हाला न्याय मिळणार नाही. माझ्या डोक्यात असे आहे की, हा तुमचाच प्रश्न आहे असे नाही. आम्ही जाईल तिथे लोक म्हणतात दुधाच्या भावासंबंधी राज्य सरकारपुढे म्हणणे मांडावे लागेल, असे आश्वासही शरद पवारांनी दिले. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, पाणी- चाऱ्या बाबत आता काही करू शकत नाही. मुंबईला गेल्यावर सरकारशी बोलेन. चार महिन्यांनी निवडणुका येतील,आमचा प्रयत्न आहे की काहीही करून सरकार बदलायच आहे. तोवर काही करू शकत नाही. इथली जमीन करायला मोदी येणार नाहीय, काहीही झाले तर जमीन करायची. पाणी प्रश्न सोडवावा, अशी मागणी आपण सगळे एकत्रित असलो तर सरकार करेल, मी तुमच्या सोबत असेल, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला. आजच्या घडीला संसार चालवायला, दुधाचा धंदा हा एकमेव धंदा आहे. जेणेकरुन प्रपंच चालतो. सरकार बदलल्याशिवाय आपल्याला पाहिजेत ते निर्णय घेता येत नाहीत. माझ्याकडे 10 वर्ष देशाच्या शेतीचे काम होते, त्यावेळी कर्जमाफी केली. शेतीमालाचे भाव वाढवून दिले. सत्तेचा वापर लोकांसाठी करायचा असतो, असे पवार म्हणाले.

# मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावे : देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा समाजाला सगेसोयरे आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाच दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. मंगळवारी त्यांची प्रकृती खालावली होती, ग्रामस्थांच्या विनंतीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपचार घेतले. पण त्यानंतर बुधवारी सकाळी बोलताना तोडगा काढला नाही, तर उपचार घेणार नाही, अशी आपली भूमिका स्पष्ट केली. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाबाबत उपमुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आरक्षणाबाबत सरकार सकारात्म आहे, मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते मुंबईत बोलत होते. मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे, त्याबाबत सरकार गंभीर आहे. त्यांच्या मागण्यावर सरकार कारवाई करत आहे. मागच्या काळात आम्ही त्यांना जे आश्वासन दिले, केसेस परत घेण्याचे ती प्रक्रिया सुरू आहे. त्यांची मागणी आहे. त्याबाबत देखील सरकारने पहिले नोटिफिकेशन जारी केलेले आहे, त्यावर कार्यवाही सुरू आहे.



# चंद्राबाबू नायडूंनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

आधुनिक केसरी न्यूज


**विजयवाडा :** तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) प्रमुख एन चंद्राबाबू नायडू यांनी बुधवारी (12 जून) चौथ्यांदा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विजयवाडा येथील केसरपल्ली आयटी पार्क येथे झालेल्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि बंदी संजय कुमार यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. अमित शाह आणि जेपी नड्डा मंगळवारी संध्याकाळीच या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी हैदराबादला पोहोचले होते.

चंद्राबाबू नायडू यांच्यानंतर जनसेना प्रमुख आणि अभिनेता पवन कल्याण यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्र्यांसह 23 मंत्री आहेत. टीडीपीचे 19, पवन कल्याणसह जनसेनेचे 3 आणि भाजपचा एक मंत्री आहे. एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

चंद्राबाबू नायडू यांचे पुत्र आणि टीडीपीचे सरचिटणीस नारा लोकेश यांनाही चंद्राबाबू नायडू सरकारमध्ये मंत्री करण्यात आले आहे. याशिवाय टीडीपी आंध्र प्रदेशचे अध्यक्ष के. अचन्नायडू आणि जनसेना पक्षाच्या राजकीय व्यवहार समितीचे अध्यक्ष नदेंदला मनोहर हेही मंत्रिमंडळात आहेत. टीडीपीच्या मंत्र्यांमध्ये 17 नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे. जनसेना पक्षाकडे पवन कल्याण, नदेंदला मनोहर आणि कंदुला दुर्गेश हे तीन मंत्री आहेत, तर सत्यकुमार यादव हे भाजपच्या कोट्यातील एकमेव मंत्री आहेत. चंद्राबाबू नायडू यांच्या मंत्रिमंडळात तीन महिला आहेत. एन मोहम्मद फारुख यांच्या रूपाने एका मुस्लिम चेहऱ्याचाही मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सावध ऐका पुढल्या हाका

आधुनिक केसरी

ही इतिहासातील उदाहरणे झाली तर आजही तरुण वयातच नेत्रदीपक कार्य करणाऱ्या तरुणांची आपल्या देशात कमी नाही. डोळे उघडे ठेवले तर आपल्या भोवतीच अनेक उदाहरणे दिसतील. डॉ राधाकृष्णन एका ठिकाणी असं म्हणाले होते की आपण माणूस अर्धवटच घडवला. म्हणजेच आपल्या मुलांना माणूस म्हणून पूर्णांशाने घडवण्यात आपण अपयशी ठरलो आहोत. अशा माणसांच्या ताब्यात पुढे आपल्याला देश द्यायचा आहे. आज राजकारणी ,अधिकारी, नेते, मंत्री, उद्योगपती जो तो केवळ आपला स्वार्थ पाहताना दिसतो आहे. आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटना जोपर्यंत स्वतःपर्यंत येत नाहीत, तोपर्यंत मला काय त्याचे अशा सोयीस्कर प्रवृत्तीने गप्प बसत आहेत. पण जेव्हा शेजाऱ्याच्या घराला आग लागलेली असते, तेव्हा त्या आगीचा धोका आपल्याही घराला कधी ना कधी होऊच शकतो हे विसरून चालणार नाही. अशा वेळी हातावर हात धरून बसून राहणे चालणार नाही. संकट आपल्यापर्यंत येईल याची वाट न पाहता वेळीच त्याचा प्रतिबंध करायला हवा. अशा काही घटना घडल्या की आम्ही वरवरची मलमपट्टी करतो. मुलाचं वय गाडी चालवण्यायोग्य नसताना, त्याच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नसतानाही आपण त्याच्या ताब्यात गाडी देतो. तो बारमध्ये, पबमध्ये किंवा आणखी कुठे जातो हे माहित असूनही त्याकडे सोयीस्कर डोळेझाक करतो. माझा मुलगा आहे, म्हणून त्याच्यासाठी वेगळे नियम असावेत अशी अपेक्षा आपण कशी करू शकतो ? कायद्यापुढे सगळे समान असतात असं आपण नुसतं म्हणतो, पण खरंच कायदा सगळ्यांसाठी समान असतो का ? पोलीस, अधिकारी, नेते, सगळ्या गुन्हेगारांना समान वागणूक देतात का ? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत हे सुज्ञास सांगण्याची आवश्यकता नाही. आपण वरवरच्या फांद्या छाटतो. पण मुळापर्यंत आपण कधी जाणार ? या सगळ्या समस्यांचे मूळ मुलांना लहानपणापासून दिल्या जाणाऱ्या संस्कारात आहे हे आपल्या कधी लक्षात येणार ? नुसते सांगून मुलं ऐकत नाहीत. आईवडिलांनी आपल्या स्वतःच्या वागण्याने त्यांच्यापुढे आदर्श उभा करावा लागतो. त्यासाठी आईवडिलांनी पालक म्हणून त्याग करण्याची तयारी ठेवावी लागते. संयमाचे, संस्कारांचे बाळकडू मुलांना द्यावे लागते. आपले पाल्य नुसते शिक्षित होऊन चालणार नाही, तर ते सुशिक्षित झाले पाहिजेत.




## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

'मतिरत्नाकर' नावाच्या महानुभवी ग्रंथात तर गोरक्षनाथांसंबंधी म्हटले आहे, 'आणि गोरक्ष जन्मला शूद्र कुळीं.' त्यांचा जन्म ब्राह्मणकुळात



झाला असल्याचेही काही संशोधक सांगतात. त्यांचे वैराग्य प्रखर होते. आपल्या वैराग्यपूर्ण मार्गावरून घसरणाऱ्या आपल्या गुरूस, म्हणजे मत्स्येन्द्रनाथास त्यांनी सावरले. म्हणून की काय ज्ञानेश्वर त्यांना 'विशयविध्वंसैकवीर' म्हणतात. त्यांचा संचार सर्व भारतभर असून अमरनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर ही शिष्यपरंपरा महाराष्ट्राच्या दृष्टीने फ़ारच महत्त्वाची आहे. गोरखनाथांचा एक महत्त्वाचा विशेष असा की, त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी आपला धर्मविचार लोकभाषांतून सांगितला. संस्कृत, प्राकृत वा अपभ्रंशमिश्र हिंदी अशा भाषांतून त्यांचे ग्रंथ मिळतात. अमनस्कयोग, ज्ञानदीपप्रबोध, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता, योगमार्तंड, गोरक्षकल्प, अवधूतगीता, गोरक्षगीता, गोरखबानी; असे काही ग्रंथ गोरक्षनाथांच्या नावावर मिळतात. अमरौघशासनम, महार्थमंजरी, सिद्धसिद्धान्तपद्धती; हेही ग्रंथ गोरक्षनाथांचे म्हणून सांगतात. योगधारणा, पिंडब्रह्मांडविचार, कुंडलिनीजागृती, गुरुचे महत्व, देशकालातीत व जातिभेदातीत तत्वज्ञान, लोकभाषांचा उपयोग; हे गोरक्षनाथांच्या पंथांचे मुख्य विशेष होत. हिंदू व मुसलमान एका विचारावर प्रथम वावरले ते गोरक्षनाथांच्या परिवारात. नाथपंथाच्या रावळ शाखेत आजही मुसलमानांचा भरणा विशेष दिसतो.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

केवळ देहाच्या व जाणिवेच्या दृष्टीने पाहिले तर मेलेल्या माणसाचे मागे काहीच शिल्लक रहात नाही मग अज्ञानी माणसांमध्ये असे काय असते की जे गेल्यानंतर शिल्लक उरते आणि त्याला परत जन्माला घालते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

या प्रश्नाचे उत्तर या देहांन्तनिरूपण समासात समर्थ आपल्याला देत आहेत. त्याचा साधकबाधक विचार आपण या समासात करणार आहोत.

ज्ञानी पुरूषाचा असा प्रत्यक्ष अनुभव आहे की माणसाला जसा स्थूल देह असतो तसाच त्याला एक अदृष्य देह व सुक्ष्म देह पण असतो.



आधुनिक केसरी

## मोक्ष द्वार ज्याने | उघडीले ||

काय वर्णु गुण | तुमचे माऊली ||
झालात सावली | अनाथांची ||१||
छळले जयाने | तारिले तयसी ||
ऐसा ऋषिकेशी | तुम्हा ठायी ||२||
मुढासी शहाणे | करूनी सोडिले ||
चैतन्य दाविले | जड भिंती ||३||
अहंकार रूप लीन | झाला भाव ||
सापडला देव | संजीवन ||४||
कर्म ज्ञान भक्ती | दाविली ज्ञानाने ||
मोक्ष द्वार ज्याने | उघडीले ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प
८८वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## विवेकी-आत्मपरीक्षण


मानवी आयुष्याचे कोडे मोठे विलक्षण आहे. श्वासाच्या गतीबरोबर माणूस आयुष्याचे कालचक्र ही फिरवीत असतो. सुखाच्या हव्यासाला बांधलेली जीवनाची दोरी अनेक अनुभवांच्या कटु-गोड वळणावरून जातांना जगण्याची जाणीव करून देते. पोतराजाने आसूडाचे फटकारे एकामागून एक स्वतःच्या पाठीवर ओढावेत व पाहणार्याच्या मनात भयाचा ओरखडा उमटत जावा, तसे नियती अपेक्षाभंगांचे आसूड ओढून संवेदनांना प्रतिक्षण घायाळ करते, असे सामान्य माणसांच्या जगण्याचे व्यावहारिक गणित आहे. हे खरे आहे की, माणूस प्रत्येक दिवशी जीवनाची पुढची पायरी चढत जातो आणि प्रत्येक नव्या वळणावरती दुसर्यांशी कमी पण स्वतःशीच जास्त लढत रहातो. हे लढणे, त्याच्यामधल्या जिवंतपणाची खूण आहे. मला आनंद का झाला, राग का आला? अशा छोट्या-छोट्या संवेदनांबद्दल, जाणीवांविषयी जागृत असणं, ही सुद्धा स्वतःची स्वतःशी केलेली लढाई आहे. या प्रक्रियेतून आपण आत्मपरीक्षण करतो, स्वतःला तपासतो, स्वतःला नीट ओळखत जातो. यातून स्वतःला शिस्त लागते. बहुतांशी आपण भ्रमात जगतो किंवा जगण्याचे समर्थन करण्याची सवय स्वतःला लावून घेतो. यश, अपयश दोन्हींकडे आपण उघड्या डोळ्यांनी पहातच नाही. समर्थने व बहाणे यामुळे आपले चांगले संकल्प पूर्ण होत नाहीत. इतरजण हे करतात म्हणून आपण करतो. अशा आचार प्रधानतेपेक्षा माणसाने चिंतन प्रधान असणे, केव्हाही चांगले. आपल्या प्रत्येक आचार-विचाराकडे गंभीरतेने पाहून त्याची योग्यता-अयोग्यता प्रामाणिकपणे ओळखणे व अयोग्यता दूर करून सुधारणा करणे, हा व्यक्तिमत्त्व विकासाचाच एक भाग आहे. संत तुकाराम महाराज विचारपूर्ण साधनेची रीत कथन करतात - 'तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणासी॥' हे माणसाच्या जगण्यालाही लागू पडणारे सूत्र आहे. मित्रांच्या संगतीत, गप्पांमध्ये अमूल्य वेळ वाया घालवणे, कोणाच्यातरी मागे लागून किंवा प्रभावात येऊन आयुष्याची वर्षे निरर्थक घालवणे, ध्येय विसरून, पालकांच्या भावना दुर्लक्षित करून आपल्याच धुंदीत जगणे, चंगळवादी जीवनशैली स्वीकारणे, अयोग्य मार्गाने खूप पैसा मिळवण्याचे प्रयत्न करणे, इत्यादी अनेक गोष्टींचे युवा मनाला, कर्तृत्वाला ग्रहण लागले आहे. ते विवेकी आत्मपरीक्षणानेच घालवता येईल.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# नामाचे सूक्ष्म स्वरूप

आधुनिक केसरी

नुसते ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ' नोकरी नोकरी ' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ' रामनाम ' आणि ' नोकरी ' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ' राम राम ' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी




करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ' नोकरी नोकरी ' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण ' राम राम ' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ' राम राम ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ' नोकरी नोकरी ' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ' राम राम ' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता ' राम राम ' जपावे.मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकचः प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. ' मी ' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

**११. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सहज योग एक योग है,
अवर योग सब रोग ।
वेद आदि गुरु सन्त हैं, गुप्त धार
चल लोग ।।०९।।(स्वर्वेद पंचम
मण्डल प्रथम अध्याय)
०५/०१/०९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : सहज योग (विहंगम योग) एक योग आहे ज्याची धारा प्राप्त करून अनुभव मार्गाने अनुरागी जीव मार्गक्रमण करतात. ज्याचे आदि आचार्य वेदांमध्ये "संत" सांगितलेले आहेत. सहज योगा व्यतिरिक्त अन्य सर्व योग हे प्राकृतिक, दुःखाचे मार्ग आहेत. त्यांच्या द्वारे प्रभू-प्राप्ती होत नाही तर आत्मशक्तीस घेऊन प्रकृती मंडलात मन, प्राण आणि भौतिक शक्तींचा विकास होतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, १३ जून २०२४
adhunikkesari.com





वाशी येथील वन विभागाच्या हद्दीतील झाडांची फाल्गुन महिन्यातील वसंत ऋतूत झालेली होरपळ... आणि त्याच झाडांची त्याच ठिकाणावरून ज्येष्ठ महिन्यातील वर्षा ऋतूत कॅमेऱ्याने टिपलेली मनमोहक हिरवळ. छायाचित्र : सचिन कोरडे

# कांदा, दूध दरवाढीवर आवाज उठविणार

## दिल्लीतही खा. नीलेश लंकेंभोवती माध्यमांचा गराडा !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**नगर :** माझ्या मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती पाहिली तर बहुतांश भाग ग्रामीण बहुल आहे. निवडणूकीदरम्यान कांद्याची निर्यात बंदी आणि दूधाची दरवाढ हे प्रश्न माझ्या निदर्शनास आले. हे ज्वलंत प्रश्न असून त्याविरोधात आपण संसदेत आवाज उठविणार असल्याचे खा. नीलेश लंके यांनी नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. लोकसभा निवडणूकीत यश संपादन केल्यानंतर नीलेश लंके हे सहकाऱ्यांसमवेत प्रथमच बुधवारी नवी दिल्लीत पोहचले. लंके हे देशाच्या राजधानीमध्ये पोहचल्यानंतर माध्यमप्रतिनिधींनी त्यांना गाठून त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला. लंके यांनी मात्र प्रत्येक प्रश्नाला मोठया खुबीने उत्तरे देत आपली राजकीय परीपक्वता सिध्द केली. लंके यांच्या समवेत राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, प्रमोद मोहिते, डॉ. बाळासाहेब कावरे, नितिन चिकणे, सुभाष शिंदे, रामा तराळ, गौरव भालेकर, सुनील कोकरे यांच्यासह असंख्य लंके समर्थक उपस्थित होते. लंके म्हणाले, कांदा, दूध दराबरोबरच पिण्याच्या, शेतीच्या पाण्याचे प्रश्न आहेत. औद्योगिकरणाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न येणाऱ्या कालखंडामध्ये हे प्रश्नही मी सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे. लंके म्हणाले, माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यासाठी दिल्ली नविनच आहे. माझ्यासाठी लोकसभेची निवडणूक अविस्मरणीय झाली. मी एकदम सर्वसामान्य कुटूंबातला असून माझ्या राजकीय प्रवास अतिशय खडतर झालेला आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना ग्रामपंचायतीचा सदस्य, सरपंच ते खासदार या पदापर्यंत पोहचण्याचा बहुमान मला या मतदारसंघातील मायबाप जनतेने दिला असल्याचे लंके यांनी सांगितले.



**माझ्यासाठी भाग्याचा दिवस :** नेते मंडळींनी माझ्यावर विश्वास टाकला . मतदारांनी तो विश्वास सार्थकी ठरविला . दिल्लीमध्ये आल्यानंतर एक वेगळं वातावरण पहायला मिळालं . कधी आपण स्वप्नात न पाहिलेली दिल्ली, आज आपल्याला प्रत्यक्षात संसदेत जाण्याचा बहुमान मिळणार आहे . माझ्यासाठी हा भाग्याचा दिवस आहे .

**त्यांच्या शुभेच्छा ग्राहय धरून काम :** विरोधी उमेदवार डॉ . सुजय विखे यांनी तुम्हाला शुभेच्छा दिल्या का ? या प्रश्नाला उत्तर देताना खा . लंके म्हणाले, अद्याप तर मला शुभेच्छा तर आलेल्या नाहीत . शुभेच्छा आल्या नसल्या तरी त्या ग्राहय धरून पुढे काम करायचे असल्याचे लंके म्हणाले .

**त्या प्रश्नावर बोलावे लागेल :** गुजरातच्या कांद्याच्या निर्यातीस परवानगी मिळते . तिथल्या कांद्याला भाव मिळतो या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, याच प्रश्नावर आता आम्हाला बोलावे लागणार आहे, असे लंके म्हणाले .

**मला संसदेत तर जाऊ द्या :** केंद्राने बजेट सादर केले त्यात महाराष्ट्राला ८ हजार कोटी, उत्तर प्रदेश, बिहारला १५ ते २० हजार कोटी दिले आहेत . महाराष्ट्राच्या दृष्टीने हा दुजाभाव नाही का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, दुजाभाव निश्चित आहे, मात्र मी अद्याप संसदेमध्येच गेलेलो नाही, तिथे गेल्याशिवाय या प्रश्नावर मला बोलता येणार नाही .

**मी छोटा कार्यकर्ता :** राज्यसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून अजित पवार यांच्याकडून सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांची नावे पुढे येत आहे . पवार यांच्याकडून पक्ष ते परीवार अशा पध्दतीने वाटचाल सुरू आहे का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, अजितदादा एका पक्षाचे नेते आहेत . ते त्यांचा निर्णय घेतील . माझ्यासारख्या छोटया कार्यकर्त्याने इतक्या मोठया राजकीय उंचीवरील विषयावर भाष्य न केलेले बरे .

**मी कोणालाही अंगावर घेत नाही :** तुम्ही नेहमी अजित पवार यांच्या बाबतीत बोलताना सांभाळून बोलता, इतरांना मात्र अंगावर घेता असे का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी कोणालाही अंगावर घेत नाही . मी कामाला महत्व देणारा माणूस आहे . समोरच्याची रेष पुसण्यापेक्षा आपली रेष वाढवायची हा माझा प्रयत्न असतो त्यामुळे अशा भानगडीत मी पडत नाही . आपण गरीब माणसं आहोत .

# वीज वाहिनीच्या झटक्याने सात शेळ्या व दोन मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील मलठणच्या दंडवते माळ्यानजीक काल मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास पाऊस पडल्याने शेतकरी उत्तम बाळासाहेब गोडसे हे शेळ्या घरी घेऊन जात असताना वीज वाहिनीचा धक्का बसल्याने सात शेळ्यांचा तर दोन मेंढ्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. सुदैवाने शेतकरी उत्तम गोडसे रा.मलठण हे या घटनेत बचावले.या घटनेत गोडसे यांचे सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

मलठण येथील गोडसे हे शेतकरी आपल्या शेळ्यांचा कळप चरावयास घेऊन गेले होते. सायकांळी सहाच्या सुमारास ते शेळ्या घरी घेऊन जात होते. यावेळी प्रवाहित वीज वाहिनीचा धक्का ९ शेळ्या व २ मेंढ्या यांना बसल्याने शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. शेळ्या जागीच पडल्याचे पाहिल्यानंतर गोडसे हे सावध झाले. ते पुढे गेले नाहीत, त्यामुळे ते बचावले. त्यांनी ही माहिती तेथील स्थानिक ग्रामस्थांना दिली. त्यानंतर महावितरणला माहिती देऊन तेथील वीज प्रवाह खंडित करण्यात आला.

तालुक्यातील मलठण येथे घडलेली घटना नक्कीच दुर्दैवी आहे . प्रत्यक्ष घटनास्थळावर आजच भेट देत पहाणी करणार असून घटनेचा पंचनामा केल्यानंतर संबंधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळण्या कामी प्रस्ताव सादर करणार असून शासन नियमाप्रमाणे संबधीत शेतकऱ्यास लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळण्यासाठी नक्कीच प्रयत्न करणार आहे .
**सुमित जाधव – उपकार्यकारी अभियंता,महावितरण,शिरूर**






# मुस्लिम समाजाला शैक्षणिक आरक्षण मिळाले पाहिजे : उमेश पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** या निवडणुकीत आमच्याकडून काही चूका किंवा त्रुटी राहिल्या होत्या त्यातून बोध घेऊन दुरुस्त केल्या जातील आणि आम्ही विधानसभेला सामोरे जाऊ असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

महायुतीमध्ये कोणतेच वाद नाहीत. निवडणुकीत ज्यांना यश मिळाले आहे त्यांच्याकडून काही वक्तव्य येत आहेत तर अपयशामुळे आमच्या खालच्या स्तरावरील कार्यकर्त्यांची वक्तव्य येत आहेत परंतु येणारी विधानसभा डोळ्यासमोर ठेवून आमच्यामध्ये कोणातही समज - गैरसमज निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले.

अंतर्गत मतभेदाचे विषय समन्वय समितीसमोर मांडून त्याचे निराकरण केले जाईल. त्यामुळे 'आमचे लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे आहे हेही उमेश पाटील यांनी सांगितले. संघाचे 'ते' अधिकृत मुखपत्र नाही पण संघाच्या विचारधारेची भूमिका मांडणारे ते मुखपत्र आहे. त्यात ज्यांनी हा लेख लिहिला आहे त्याच्याशी भाजपचे शिर्षस्थ नेते सहमत आहेत असे मला वाटत नाही असे सांगतानाच अपयश आल्यावर त्याला वेगवेगळी कारणे शोधली जातात. राजकीय पक्ष एकमेकांच्या विरोधात असतात त्यावेळी त्रुटी शोधून आरोप करत असतात. राजकारणात आरोपप्रत्यारोप होत असतात. अंतिम निष्कर्षावर सगळे ठरत असते. संघाने जे काही म्हटले आहे त्यात तथ्य आहे असेही मला वाटत नाही असेही उमेश पाटील म्हणाले.

अजितदादांचे राजकीय काम आणि मेहनत लक्षात घेऊन त्यांच्यासोबत दिर्घकालीन राहण्याचा निर्णय भाजपच्या शिर्षस्थ नेतृत्वाने घेतला आहे त्यावर ते ठाम आहेत असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले.

शिव - शाहू - फुले - आंबेडकरांची पुरोगामी विचारधारा मुस्लिम समाजासाठी धोरणे आखणे किंवा विशेष तरतूद करणे म्हणजे पुरोगामी विचारधारा नाही तर पुरोगामी विचार हा सर्वधर्मसमभाव सांगणारा आणि सर्व समाजघटकांना सोबत घेऊन जाणारा विचार आहे. तो समतेचा विचार आहे. मुस्लिम समाजातील अनेक लोकांचे देशासाठी मोठे योगदान राहिले आहे. या समाजाच्या शैक्षणिक आणि त्याच्या आर्थिक प्रगतीकरता संविधानात सांगितले आहे त्यानुसारच मदत केली जात आहे. आम्ही मुस्लिम समाजाला ५ टक्के शैक्षणिक आरक्षण देण्यासंदर्भात निर्णय घेतला होता तो निर्णय उच्च न्यायालयात स्विकारला गेला होता. नंतरच्या काळात तो विषय मागे पडला. मात्र मुस्लिम समाजाला शैक्षणिक आरक्षण मिळाले पाहिजे ही आमची भूमिका ठाम आहे असेही उमेश पाटील यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# राहुल गांधींची टीका

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये काँग्रेसचे नेते राहुल गांधी केरळमधील वायनाड आणि उत्तर प्रदेशमधील रायबरेली या दोन्ही मतदारसंघातून विजयी झाले. नियमाप्रमाणे त्यांना कोणत्या तरी एकाच मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करावे लागणार आहे. यासाठी त्यांना कोणत्या तरी एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागेल. २०१९ साली जेव्हा राहुल गांधींचा अमेठीतून पराभव झाला होता, तेव्हा केरळच्या वायनाडमुळेच त्यांना लोकसभेत जाणे शक्य झाले होते. अडचणीच्या वेळेला वायनाडने राहुल गांधींची साथ दिली. आता काँग्रेसच्या परंपरागत रायबरेलीतूनही विजय झाल्यानंतर वायनाड की रायबरेली? असा प्रश्न राहुल गांधी यांच्यासमोर उभा राहिला आहे. दोन्ही लोकसभा मतदारसंघात विजय मिळविल्यानंतर राहुल गांधींनी काल रायबरेतील मतदारांची भेट घेतली होती. तर आज केरळमधील नायनाड मतदारसंघातील जनतेशी संवाध साधून त्यांचे आभार व्यक्त केले. राहुल गांधी म्हणाले, माझ्यासमोर आता धर्मसंकट उभे राहिले आहे. मी रायबरेलीचा किंवा वायनाडचा खासदार राहू शकतो. पण मी कोणताही मतदारसंघ निवडला तरी दोन्ही कडील लोकांना आनंदच होणार आहे. केरळमधील मलप्पुरम येथे बोलताना राहुल गांधी म्हणाले, समाजात द्वेष पसरविणाऱ्यांना चपराक बसेल असा २०२४ च्या लोकसभेचा निकाल लागला आहे. माणुसकीचा अंहकारावर आणि प्रेमाचा द्वेषावर विजय झाला आहे. राहुल गांधी यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदीवरही टीका केली. ते म्हणाले, अयोध्या ज्या मतदारसंघात येते त्या फैजाबादमध्ये भाजपाचा पराभव झाला. लोकांनी हिंसा आणि द्वेषाच्या विरोधात मतदान केले. खरंतर वाराणसीमध्येही पंतप्रधान मोदींचा पराभव होता होता राहिला. भाजपाचा तर अयोध्येत पराभव झालाच. पण वाराणसीनेही मोदींचा मार्ग सहज मोकळा केला नाही. मी मोदींप्रमाणे देव नाही. मी साधा माणूस आहे. मोदी सांगतात त्यांच्यात परमात्मा आहे. पण तो परमात्मा सर्व निर्णय अदाणी आणि अंबानी यांच्यासाठी घेतो. त्यांच्यातला परमात्मा एका सकाळी सांगतो, मुंबई विमानतळ अदाणीला देऊन टाका. मोदीजी विमानतळ देऊन टाकतात. मग परमात्मा म्हणतो, आता लखनौ विमानतळही देऊन टाका. मग तेही विमानतळ दिले जाते. मग ऊर्जा प्रकल्पही देऊन टाकले जातात. अदाणींना संरक्षण क्षेत्रात मदत व्हावी, म्हणून अग्नीवीर सारखी योजना आणली जाते. दुर्दैवाने माझ्याकडे अशी दैवी शक्ती नाही, मी फक्त माणूस आहे. पण माझे दैवत देशातील गरीब लोक आहेत. म्हणून मी माझ्या देवाशी चर्चा करतो आणि ते मला काय करायचे हे सांगतात", असा टोलाही राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींना लगावला.

# नीट परीक्षेतील अनियमितता

आधुनिक केसरी



डॉ. शरद दुधाट
9834132138

**नीट, सीईटी, जेईई वा इतर तत्सम परीक्षा म्हटले की विद्यार्थ्यांच्या बौद्धिकतेची कसोटी. विद्यार्थी जिवाचे रान करून या परीक्षांना सामोरे जातात. ते त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि आयुष्याच्या यशस्वीतेसाठी. या सर्व परीक्षा त्यांच्या जीवनातील यशाची पहिली पायरी असतात. पुढेही एक-एक पायरी चढताना त्यांचा जीवनप्रवास हवा तेवढा सुखकर नसतो. रस्त्यांवरील स्पीडब्रेकर प्रमाणे असंख्य अडथळ्यांना तोंड देत सोशिकतेने आणि सहनशीलतेने त्यांना यशाचे शिखर गाठायचे असते. देशसेवा, रुग्णसेवा हा त्यांच्या जीवनाचा ध्यास असतो. हा या ध्येयाच्या ध्यासातला इयत्ता बारावीनंतरचा त्यांचा जीवनप्रवास हा तसा दिव्यच.**

देशभरात नीट ही वैद्यकीय प्रवेश पूर्वपरीक्षा तेरा प्रादेशिक भाषांमधून घेतली जाते. त्यात हिंदी, इंग्रजी, मराठी, उर्दू, तमिळ, तेलगू, मल्याळम, ओरिया, कन्नड, गुजराती, आसामी, बंगाली या प्रादेशिक भाषांचा समावेश आहे. ही भारतातील सर्वात मोठी पदवीपूर्व वैद्यकीय प्रवेश परीक्षा पेपर वर्क म्हणजे ऑफलाईन पद्धतीने घेतली जाते. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी विद्यार्थ्याला चार गुण दिले जातात आणि प्रत्येकी चुकीच्या उत्तरासाठी एक गुण वजा केला जातो. म्हणजेच उत्तर बरोबर आले तर चार गुण मिळतात आणि उत्तर चुकले तर पाच गुण कमी होतात. ही या परीक्षेची गुण योजना आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांमध्ये या विद्यार्थ्यांना किमान ५० टक्के गुण आवश्यक असतात. या विद्यार्थ्यांची वयोमर्यादा १७ ते २५ या वयोगटातील असते. या परीक्षेसाठी विद्यार्थी रात्रीचा दिवस करून खूपच परिश्रमाने या परीक्षेला सामोरे जातात. ही परीक्षा त्यांच्यासाठी उज्ज्वल भविष्याचा किरण असते की ज्यातून त्यांच्या भविष्याला आकार मिळणार असतो. या परीक्षेची तयारी म्हणजे विद्यार्थी आणि पालकांची प्रचंड तारेवरची कसरत असते. मुळातच विद्यार्थी बारावीला गेला की विद्यार्थी, पालक आणि कुटुंबात खूपच ताणतणावाचे वातावरण असते. बऱ्याच वेळा विद्यार्थी आणि पालकांना आपण कोणत्या दिशेने जावे हे माहिती नसते. बारावीनंतर पुढे काय करायचे ? हेच निश्चित नसते. बहुतांशी विद्यार्थी दिशाहीन असतात. निकाल लागल्यानंतर पाहू. असे त्यांचे बिनबुडाचे उत्तर. विद्यार्थी व पालक मोठ्या संभ्रमात असतात. योग्य वेळी योग्य ते मार्गदर्शन लाभलेले विद्यार्थीच आपली दिशा निश्चित करतात. इयत्ता बारावी नंतरच्या नीट, सीईटी जेईई आदी स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना त्यांना शारीरिक, मानसिक तणावाबरोबर आर्थिकतेचा सामना करावा लागतो. अभ्यास कोणता आणि कसा करावा याबाबत अनभिज्ञता असते. कोणता क्लास? कोठे जायचे? तेथील पूर्वनिकाल काय? क्लास, वसतिगृह आणि मेसची भरमसाठ फी हे सगळे अवाक् करणारे. एवढा वेळ, पैसा, श्रम खर्च करून पदरात काय पडेल? त्याचीही अनिश्चितता. योग्य रँक मिळाली नाही की निराशा. पुन्हा परीक्षा, तोच अभ्यास. यातून विद्यार्थ्यांची खूपच हेळसांड होते. खूप कमी वयात या मुलांची मने कोमेजून जाणार.या विद्यार्थ्यांच्या अंगी खूपच सोशिकता आणि सहनशीलता हवी असते; परंतु याच परीक्षा त्यांच्या भविष्यातील स्माईल स्टोन ठरतात. काही लोक स्वतःच्या फायद्यासाठी मात्र या खडतर तपश्चर्या आणि परिश्रम घेणाऱ्या उज्ज्वल विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत असतात. स्वतःच्या स्वार्थापोटी इतर प्रामाणिक कष्टाळू, अभ्यासू विद्यार्थ्यांचा विचार न करता गुण वाढविण्यासाठी, रँक मिळविण्यासाठी गैरमार्गाने गुण मिळविण्याचा प्रयत्न करतात.

देशात विविध शासकीय नोकऱ्यांकरीता आणि विविध व्यावसायिक सामूहिक परीक्षांतील घोटाळे आणि मूल्यमापनातील दोष ही काही नवीन नाही. गेल्या दहा वर्षात शासकीय यंत्रणांनी यासंबंधी ठोस उपाययोजना केली असली तरी त्यांचा कायमचा बंदोबस्त करणे मात्र अवघड आहे. हे घोटाळे भारतासमोरील आव्हाने अधोरेखित करतात. या प्रक्रियेमध्ये शिक्षण आणि भरती प्रणालीची निष्पक्षता आणि पारदर्शकता सूचित करणे आवश्यक आहे. लोकसभेने भरती परीक्षांमधील गळती आणि गैरप्रकारांना आळा घालण्याच्या उद्देशाने पब्लिक एक्झामिनेशन्स (अनफेअर मीन्स प्रतिबंध) विधेयक २०२४ मंजूर केले आहे. या विधेयकामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि राष्ट्रीय चाचणी एजन्सीद्वारे आयोजित केलेल्या संगणकीकृत परीक्षांचा समावेश आहे. सप्टेंबर २०२१ मधील तामिळनाडू राज्यातील नीट घोटाळा प्रकरण फार जुने नाही. या प्रकरणातून अनेक विद्यार्थ्यांना नाराजी आणि नैराश्याला सामोरे जावे लागले होते. काही विद्यार्थ्यांनी या नैराश्यातून आत्महत्या केल्या. याचे पडसाद तेथील विधानसभेत उमटल्यामुळे राज्यात नीट परीक्षा नको, अशी भूमिका असणारे विधेयक तेथील विधानसभेत संमत करण्यात आले. २०२२ मधील वैद्यकीय परीक्षा घोटाळा, २०१३ मधील मध्य प्रदेशातील व्यापम घोटाळा, तेलंगणातील परीक्षा घोटाळा अशा असंख्य घोटाळा प्रकरणात यावर्षीच्या नीट परीक्षेची अनियमिततेची अधिक भर पडली आहे. दि. ५ मे २०२४ रोजी देशभरातून झालेली वैद्यकीय पदवीपूर्व अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा एनईईटी-युजीच्या ४ जून २०२४ च्या निकालावरून वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

देशभरातील ५५७ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये एनईईटी-युजीच्या माध्यमातून ५ मे रोजी ही सामूहिक पूर्वपरीक्षा घेण्यात आली. देशातून आणि परदेशातून या परीक्षेसाठी २४ लाख विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून जातीनिहाय प्रवेश फी परीक्षा यंत्रणेकडे भरली आहे. या परीक्षेत सरकारी चांगली महाविद्यालय मिळण्यासाठी प्रचंड चढाओढ असते. श्रीमंत लोक मुलांना डॉक्टर करण्यासाठी लाखो रुपयांची देवाणघेवाण करतात. अन्य मार्गाने चांगली रँक, चांगले सरकारी कॉलेज मिळविण्यासाठी प्रचंड धडपड करतात. मग सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे काय? त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहणार का? शिक्षक म्हणून नोकरीला लावण्यासाठीचा संस्थाचालकांचा भ्रष्टाचार सर्वश्रुत आहे; परंतु वैद्यकीय परीक्षेत रँक व चांगले कॉलेज मिळावे यासाठीचा घोडेबाजार असाच सुरू राहणार का? हा प्रश्न सर्वांनाच पडलेला आहे. दिल्लीच्या एम्समध्ये टॉप वन रँक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ४६ जागा राखीव असतात. यावेळी टॉप वन रँकचे ६७ विद्यार्थी आहेत. मग यात कोणाची बाजी लागणार. ७१५ पेक्षा अधिक गुण मिळवणारे असंख्य विद्यार्थी आहेत. मग एवढे गुण मिळूनही प्रवेश कोठे मिळणार? हा अंधारच आहे. प्रविष्ट झालेल्या एकूण विद्यार्थ्यांच्यामध्ये दहा लाख मुले तर चौदा लाखांच्या घरात मुलींची संख्या होती. देशभरात ७०६ वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसच्या १,०९,१४५ जागा आहेत. तर डेंटलच्या २७ हजार जागा आहेत. या जागांमध्ये नव्याने सुरू होणाऱ्या महाराष्ट्र आदी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील जागा असणार आहेत. एमबीबीएस, बीडीएस, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आणि पशुवैद्यकीय या सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्र नीट ही वैद्यकीय पदवीपूर्व अभ्यासक्रम परीक्षा आहे. या परीक्षेचा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला होता. त्यात ६७ विद्यार्थ्यांना ऑल इंडिया रँक वन म्हणजे ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहे. तर १५६३ विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण (ग्रेसमार्क) मिळाले आहेत. त्यापैकी ७९० विद्यार्थी सवलतीच्या गुणांनी पात्र ठरले आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये उणेपणा राहिल्यामुळे ते विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. हे गुण देताना त्यात अनियमितता आली आहे, असा आरोप देशभरातील विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. बिहारमधील पेपरफुटी प्रकरण, ठराविक विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण आणि एकाच केंद्रावरील अनेक विद्यार्थ्यांना मिळालेले पैकीच्या पैकी गुण, अंतिम उत्तर सूची जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी तातडीने निकाल जाहीर करणे अशा विविध कारणांमुळे ही परीक्षा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. नीट युजीच्या विश्वासहार्यतेविषयी शंका उपस्थित झाल्याने देशभरातून ही परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी विद्यार्थ्यांमधून होऊ लागली आहे.

एमबीबीएस, बीडीएस, पशुवैद्यकीय आदींच्या प्रवेश परीक्षेसाठी एकेका गुणांची विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा असते. कमालीची चढाओढ असते. लाखो विद्यार्थी वैद्यकीय व्यवसायात प्रवेश करण्याच्या हेतूने अहोरात्र परिश्रम घेऊन ही परीक्षा देतात. या विद्यार्थ्यांमध्ये नियमित आणि रिपीटर विद्यार्थ्यांचाही समावेश असतो. अनेक दिवसांची मेहनत, खर्च आणि अथक परिश्रमातून या परीक्षेसाठी विद्यार्थी सामोरे जातात. प्रचंड शारीरिक, मानसिक आणि आर्थिक बाबीतून हे विद्यार्थी आपली दिशा निश्चित करत असतात. अशातच या परीक्षेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले की विद्यार्थ्यांचे परिश्रम, खर्च वाया जाणार आणि मनोबलही खचले जाणार. ही परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी होत असली तरी एनईईटी युजीला ही बाब इतकी सोपी नाही. एनईईटी युजीने स्थापन केलेल्या प्राथमिक समितीच्या अहवालानुसार परीक्षेतील अनियमिततेची बाब केवळ सहा केंद्र आणि १५६३ विद्यार्थी यांच्या पुरती मर्यादित आहे; परंतु यावर आता पुन्हा एक नवीन उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष आणि अन्य तज्ज्ञांचा समावेश आहे. ही समिती आधीच्या समितीच्या निर्णयानुसार अहवालाचे अध्ययन आणि सत्यता पडताळून सरकारला एक आठवड्यात आपला अहवाल सादर करणार आहे. सरकार यावर निश्चित काय तो ठोस निर्णय घेणार आहे. ज्या केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांचा वेळ वाया जाण्याच्या निकषावर भरपाईसाठी गुण दिले आहेत, ही सहा केंद्रे आणि १५६३ विद्यार्थ्यांची ही अनियमिततेची बाब आहे. त्यामुळे उच्चस्तरीय समितीचा निर्णय हा याच वलयाशी निगडित असणार आहे. ही परीक्षा परत घेतली जाणार नसल्याचा एनईईटी युजीचा निर्णय जवळजवळ निश्चित आहे; परंतु अन्य केंद्र आणि विद्यार्थी यांच्या निकालावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे दिसते. फेरपरीक्षेची गरज भासली तर केवळ सहा केंद्रांवर ती घेतली जाईल, असे स्पष्ट संकेत शिक्षण सचिव के. संजय मूर्ती यांनी दिली आहेत.

भावी आयुष्यात पांढरा कोट नि गळ्यात स्टेथोस्कोप अडकून रुग्णसेवा करण्याची स्वप्न बघणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातात आज मात्र या अनियमिततेमळे निषेधाचे फलक आणि तोंडात जोरदार घोषणा, मनात चीड, आक्रोश आणि अन्यायाची भावना आहे. तसे पाहता या परीक्षेचा स्तर उच्च काठिण्य पातळीवर असतो; परंतु यावर्षीचे निकाल आणि विद्यार्थ्यांची रँक पाहता उच्चांकी गुण अवाक करतात. या परीक्षेतील अनियमिततेमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे अखेर विद्यार्थ्यांना केव्हा मिळणार? आणि ते उत्तर काय असणार? यातून त्यांचे समाधान होणार का? याची आता प्रतीक्षा करावी लागणार आहे. परीक्षा प्रक्रियेतील घोटाळे आणि ही अनियमितता कधी संपणार? हाच प्रश्न सर्वसामान्य विद्यार्थी आणि पालकांच्या समोर आहे. हे हवालदील झालेली विद्यार्थी आणि पालक कधी स्थिरावणार? काय डॉक्टर होण्याची स्वप्न यावर्षी धुळीस मिळणार? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

# जीवन हे समुद्रातील नौके प्रमाणे स्थितप्रज्ञ असलं पाहिजे

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**आपलं जीवन हे समुद्रातील नौके प्रमाणे स्थितप्रज्ञ असलं पाहिजे जेणेकरून सुख दुःखाच्या लाटा आपलं फार काही बिघडवू शकणार नाहीत.संसारात राहून मन निर्विकार ठेवणं तितकंस सहज सोपं नाही हे वास्तव आहे पण अशक्य नाही.म्हणून प्रयत्न केला तर मन निर्विकार ठेवता येत.ज्या प्रमाणे नौका पाण्यात असुन पाण्यापासुन अलिप्त असते अथवा अथांग समुद्राचे पाणी नौकेत प्रवेश करत नाही त्या सारखंच मानवी जीवन देखील असलं पाहिजे.आपण संसारात असताना देखिल स्वतःला संसारापासुन अलिप्त ठेवता आलं पाहिजे. संसारात अलिप्त असणं म्हणजे मोह,माया ,भौतिकता या सोबतच कोणत्याही बाबी विषयी आपल्या मनात आस नसली पाहिजे. अथवा असक्ति निर्माण नाही झाली पाहिजे.**

अगदी साक्षी भाव ठेवून संसारात वावरता आलं पाहिजे.ज्या पद्धतीने समुद्रात नौका आपल्या धेय्य मार्गावर प्रवास करताना डगमगत नाही.पैलतीर पोहचण्यासाठी अनेक वादळांशी झुंज देते पण माघारी फिरत नाही.अथवा आपली दिशा बदलत नाही पैलतीरावर जाणं हाच अंतिम निश्चय असतो .हा निश्चय पुर्ण होत असताना अनेकदा संघर्ष देखिल वाटायला येत असतो. याच संघर्षाला न घाबरता अनेक वादळांवर संकटंवर अडचणीवर मात करत ज्या प्रमाणे नौका कोणत्याही परिस्थितीत पैलतीरावर पोहचतेच त्या प्रमाणे अगणित संकटांवर मात करत आपल्याला सुद्धा आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत यशस्वी पणे पोहचता आलं पाहिजे. मन बुद्धी हि शरीर रूपी नौकेचे नावाडी असल्याने अनेक वेळा वादळानुसार भ्रम निर्माण होणं स्वाभाविक आहे. पण अट्टल निश्चय पैलतीर हाच असला पाहिजे.पाण्यामध्ये असणारी नौका ज्या प्रमाणे पाण्यात असुन सुद्धा नौकेत पाणी प्रवेश करू शकत नाही. आणि नौका आपला जो नियोजित प्रवास आहे तो अनेक वादळांना तोंड देत योग्य पद्धतीने कुठल्याही संकटा शिवाय पुर्ण करते . त्याच प्रमाणे आपण सुद्धा मानवी जीवन जगत असताना व या माया रूपी संसारात वावरत असताना मोह मायेच स्वार्थाच,लोभाच वादळ आपल्या आजूबाजूला घोंगावत असतं पण आपण त्याला बळी न पडता संसारातील अनेक बाबींपासुन स्वतःला सुरक्षित ठेवल पाहिजे. आपल्या आजूबाजूला असणार भौतिक मायारूपी पाणी हे आपल्या संसार रूपी नौकेत मध्ये प्रवेश करू शकले नाही पाहिजे. तसेच बाह्य वातावरणाचा तसेच भौतिक जगाला आपल्या मध्ये प्रवेश करू दिला नाही पाहिजे.म्हणजे आपलं जीवन हे नौके प्रमाणे असावं आपण पाण्यांत चालणारी नौका पाहिली तर एक बाब प्रकर्षाने जाणवते नौकेचा थोडासाच पृष्ठभाग पाण्यात असतो .आणि वरच्या बाजुचा बहुतांश भाग हा पाण्यावर तरंगतो म्हणजे नेमके काय तर पाण्यावर समतोल साधण्यासाठी जे काही कला कौशल्य अथवा कालागुण आवश्यक आहेत. ते काला गुण नौकेने ने आवगत केले आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 'आपसे ज्योतीत अनेको दीप अविचल चल रहे है, चलते रहेंगे...'

## ध्येय पूर्तीची 127 वर्षे

आधुनिक केसरी


***भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी स्थापन केलेल्या महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेला आज 127 वर्षे पूर्ण झालीत. त्यानिमित्य आपणा सर्वाना खुप खुप शुभेच्छा.. आपण एखादे बीज रोवावे आणि ते बहरण्याची, फुलण्याची फक्त स्वप्ने न पाहता केवळ मनी एक ध्यास घेऊन चालत रहाणे सोपे नाही.***



**अश्विनी बुजोणे**
**नागपुर**

'चरैवती चरैवती यही तो मंत्र है अपना' या प्रमाणे न थकता, न थांबता, केवळ आपल्या ध्येयाप्रति काम करत रहाणे, ते गाठण्यासाठी आखलेल्या योजना प्रभावी पणे मांडणे व त्या प्रत्यक्षात आणणे हे अधिकच कठिण. ज्या कळात महिलांना समाजात दुय्यम वागणूक दिली जायची , उंबरठ्या बाहेर पाऊल टाकण सुध्दा ज्या काळात महिलांना शक्य नव्हतं त्याच कळात त्यांच्या साठी लढा देऊन , समाजातील वाईट रूढ़ि , परंपरा मोडित काढत, दूरदृष्टी ठेऊन महिलांनाही शिक्षणाची संधी उभी राहावी , महिलांमध्येही आत्मसन्मान जागृत व्हावा, त्यांनाही स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी अण्णां नी १२८ वर्षांपूर्वी एक संस्था स्थापन केली, ती म्हणजे 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्त्री चे *शिक्षण आणि सक्षमीकरण त्या कालात इतकी दूरदृष्टि ठेऊन, केवळ शिक्षणापुरते मर्यादित न रहता एखादी स्त्री हि सक्षम कशी होईल, आत्मनिर्भर कशी होईल यावर अण्णां चा जास्त भर होता. अण्णांनी त्या काळात समाजातील चालीरीती विरुद्ध जाऊन एका विधवेशी विवाह करून नवा इतिहास रचला, पण त्यायोगे आलेली उपेक्षा , अवहेलना , टिंगलटवाळी सुद्धा सहन करत आपल्या ध्येयाप्रति ते अविचल राहिले.

वादळापरी सदा घे पुढेच धाव तु , जाण यत्न देव तु, जाण यत्न देव तु... या प्रमाणेच अण्णां नी आपले कार्य सुरु ठेवले . त्यात त्यांच्या पत्नी *बाया कर्वे* यांनी सुद्धा अतुलनीय अशी साथ दिली. संस्थे च्या आजुबाजूच्या परिसरात विविध महिलाशी संपर्क करून त्यांना जीवनावश्यक,



व्यवसासभिमुख प्रशिक्षण दिले. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. अण्णांचे हे कार्य पाहून त्यात हळूहळू कालांतराने अनेक लोक सहभागी होऊन ती एक चळवळ झाली. अण्णां ची मुल्ये, तत्वे, संकल्पना , यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार हे सगळे समाजास पटु लागले . अनेकांना कठिण परिस्थिति मधे मार्गदर्शन, आधार, मायेची उब मिळु लागली. आज त्यांच्या पश्चात त्यांनी सुरू केलेल्या या कार्यास तितक्याच चांगल्या पद्धतीने समोर नेण्याचा प्रयत्न त्यांची संस्था करते आहे . संस्थेअंतर्गत विविध अभ्यासक्रम, सेवाकार्य, वृद्धाश्रम, बालिकाश्रम, सुरु होते व आहेत. या सगळ्या कार्याची व्याप्ती निश्चितच वाढली आहे. यामुळे अनेक महिलांना, मुलींना, गृहिणीना व्यवसाय तसेच शिक्षण क्षेत्रात काम करण्याची संधी मिळतेय, आयुष्याला नवी दिशा, नवा प्रवाह सापडतोय. 127 वर्षांनंतर सुद्धा हे कार्य अविरत सुरु ठेवणे सोपे नाही. अण्णांनी घेतलेला स्त्री शिक्षणाचा , समाजसेवेचा वसा समोर नेताना त्यांना अभिप्रेत असलेले कार्य, व उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी हवी असलेली दृष्टि ही अगदी आजही त्याच धाटणीची आहे, याचा आनंद आहे. आजहि त्याच भूमिकेतून संस्थेचे आजचे पदाधिकारी व कर्मचारी सुद्धा कार्यरत आहेत. आण्णांनी 127 वर्षांपूर्वी सुरू केलेल्या संस्थेचे आज वटवृक्षा मधे रूपांतर झाले आहे. संस्थेचा व्याप वाढला आहे, विस्तार वाढला आहे . काळाच्या अनुषंगाने काही बदल करत महाविद्यालयीन मुली , महिला, व विधवा स्त्रियांना समाजाच्या कालानुरूप बदललेल्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून आज पुणे, रत्नागिरी, वाई, सातर, कामशेत व नागपुर या ठिकाणी संस्थेच्या शाळा, महाविद्यालये आहेत. ज्यातून अण्णांना अपेक्षित स्त्री सक्षमीकरणाचा प्रयत्न होतो आहे. सध्या संस्थे मार्फत ७२ विविध शाखां मधुन शिक्षण दिल्या जाते, ज्यात आधुनिक काळाला अपेक्षित असे नवनवे अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत. संस्थेचे कार्य पाहून समाजातील अनेक मान्यवर मंडळी आज या संस्थे सोबत जोडल्या गेले आहे. संस्थेमधे अनेकांना शिक्षण, रोजगार,आधार व परिवार मिळालाय. शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा टिकावून ठेवणे, त्याच बरोबर गरजु विद्यार्थिनींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणे ही काळाची गरज ओळखून विविध विषयातिल प्रशिक्षण आज संस्थेद्वारे दिल्या जाते .. शेवटी एवढेच लिहेन... अण्णांच्या आशीर्वादा च्या परिसस्पर्शाने हे ज्ञानदानाचे सेवाकार्य त्याच सचोटिने व प्रमाणिकपणे पुढे जावे तसेच संस्थेत सहभागी असलेल्या विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, देणगीदार, शुभेच्छुक, हितचिंतक आणि इतरही सगळ्यांना या महान कार्याची दूरदृष्टी लक्षात यावी, तसेच या देशाचे आणि समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून कार्य करत राहावे ,राष्ट्राच्या अमृत काळात सुरू असलेल्या पुनरुत्थानाच्या कार्यात या संस्थेचाही सहभाग रहावा हीच संस्थे च्या स्थापना दिनी सदिच्छा...

निर्माणोके पावन युग मे हम चरित्र निर्माण न भुले,
स्वार्थ साधना की आंधी मे वसुधा का कल्याण न भुले....

# अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ. बालाजी शिंदे

आधुनिक केसरी

***डॉ. बालाजी लक्ष्मणराव शिंदे यांचा जन्म नांदेड जिल्ह्यातील वायपणा बुद्रुक येथे 31 डिसेंबर1978 रोजी झाला. त्यांचं प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण गावापासून सात किलोमीटरच्या अंतरावर तामसा येथे झालं.***



**प्रा. प्रज्ञाकिरण जमदाडे**
**संपर्क : 97636 78762**

***कारण माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे हदगाव येथील कला वाणिज्य महाविद्यालय येथे शिक्षण पूर्ण झालं. त्यापूर्वी अकरावी आणि बारावी या दोन वर्षाचं शिक्षण हदगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे पूर्ण केले आहे. येथील शिक्षण झाल्यानंतर हदगाव येथील एका शाळेत डॉ. वि.ल. धारूरकर यांचे व्याख्यान झाले. त्यात त्यांनी पत्रकारितेचे महत्व सांगितलं.***

त्यानंतर पदवीचं शिक्षण घेत असताना माझाच मित्र गोविंद करवा हे सकाळ आणि प्रजावाणीच काम करीत होता. त्यांच्यासारखं समाजाचं काहीतरी देणं आहे, अस म्हणून मी सुद्धा एका नांदेड येथील प्रकाशित होणाऱ्या दैनिक महासागर आणि दैनिक एकमत या वृत्तपत्राच काम सुरू केले. यादरम्यान राष्ट्रवादी या पक्षाचं तालुका युवक अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी मला बोलावलं होतं. पण मला राजकारणाकडे जायचं नव्हतं एखादी सरकारी किंवा खाजगी नोकरी करावी हाच उद्देश होता. त्यानंतर माझं पदवीचं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी नांदेड येथे वृत्तपत्रविद्या शिक्षणा संदर्भात माहिती घेतली. नांदेड येथे दैनिक गावकरीमध्ये बबन जोगदंड आणि विकास कदम हे काम करीत होते. त्यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर त्यांनी मला औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागात पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण केलं तर चांगलं राहील,असं सांगितलं. त्या दिशेने माझी वाट वाटचाल सुरू झाली. सध्या बबन जोगदंड हे पुणे येथील यशदामध्ये एक मोठ्या पदावर कार्यरत आहेत. डॉ. विकास कदम हे गुरुगोविंद सिंग पत्रकारिता महाविद्यालयाचे संस्थापक म्हणून कार्यरत आहोत. नांदेड येथे पत्रकारितेचे शिक्षण उपलब्ध नसल्यामुळे मी थेट औरंगाबाद येथे गेलो. त्यावेळी हदगाव येथील दैनिक मापदंडचे तालुका प्रतिनिधी म्हणून संदीप भुरे हे काम करीत होते. त्यांनी त्यांचा संदर्भ देऊन औरंगाबाद येथील कार्यालयातील संपादक कानिफ अन्नपूर्णे आणि प्रकाश राठोड यांची भेट घे म्हणून सांगितले. त्यांच्या वतीने मला प्रशिक्षणार्थी उपसंपादक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. औरंगाबाद येथील दैनिक मापदंड मध्ये काम केले. त्यानंतर त्या कामाचा अनुभव घेऊन डॉ. धारूरकर सर आणि डॉ. सुधीर गव्हाणे, सुरेश पुरी सर यांनी मला मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझमच महत्व सांगितल. त्यानंतर औरंगाबाद येथील माध्यमसंकुल मध्ये मी बी.जे., एमएमसीजी आणि पीएचडी पूर्ण केलं. हे



शिक्षण पूर्ण करीत असताना दैनिक मापदंड मध्ये उपसंपादक म्हणून काम केलं. त्यानंतर औरंगाबाद येथील मच्छिंद्र चाटे यांच्या लोकसंकेत या दैनिकात मुख्य उपसंपादक म्हणून काम केले आहे. त्यांना दैनिक परवडत नसल्यामुळे कालांतराने ते दैनिक बंद केल. या दरम्यान त्यांनी मराठी चित्रपट चिमणी पाखरं हा एक चित्रपट प्रदर्शित केला होता. त्यांची जनसंपर्काची जबाबदारी माझ्यावर देण्यात आली होती आणि मी ती यशस्वी पार पाडली. या दरम्यान अनेक मराठी दिग्गज कलाकारांची ओळख झाली. त्यानंतर त्यांनी आमची ब्रँच सांभाळण्यासाठी मला नांदेड आणि पुण्याला ऑफर दिली होती, मात्र मला पत्रकारितेमध्ये करिअर करायचे असल्याने मी त्यांची ऑफर नाकारली. त्यानंतर दैनिक हिंदुस्थानचे मराठवाडा आवृत्तीप्रमुख म्हणूनही काम केले आहे. अनेक छोट्या-मोठ्या वर्तमानपत्र आणि टीव्ही चॅनलला मी काम केले आहे, या कामाचा अनुभव पाहून दैनिक पुढारीचे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव यांनी माझी कोल्हापूर येथील मुख्य कार्यालयात मुलाखत घेतली. या दरम्यान मराठवाड्यातील पुढारी सुरू करण्यासाठी एक अहवाल दिला होता. त्यांनी मराठवाडा आवडती ला वेळ आहे सध्या तुम्ही पुणे जिल्ह्यासाठी काम करू शकता का असे विचारले. मराठवाड्यात पुढारी आवृत्ती सुरू केल्यानंतर आपल्याला तिकडे पाठविण्यात येईल, असे सांगून तोपर्यंत पुणे जिल्ह्यासाठी माझी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर 2002 ते 2008 या दरम्यान मी पुणे येथील दैनिक पुढारी मध्ये आवृत्ती प्रमुख आणि दैनिक प्रभात येथे ग्रामीण आवृत्ती प्रमुख म्हणून काम केले आहे. या कामाचा अनुभव म्हणून दैनिक पुण्यनगरी चे चालक-मालक बाबा शिंगोटे यांच्याशी भेट झाली. त्यांनी नांदेड येथील दैनिक पुण्यनगरीचे आवर्ती प्रमुख म्हणून माझी नियुक्ती केली. त्यानंतर दैनिक पुण्यनगरीमध्ये दोन वर्षे काम केले. त्यानंतर दैनिक देशोन्नती मधील सर्व कर्मचारी सोडून इतर दैनिकांमध्ये रुजू झालेत. दैनिक देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे यांनी माझ्याशी संपर्क करून मला दैनिक देशोन्नतीमध्ये काम करण्यास सांगितले. त्यानंतर दैनिक देशोन्नतीमध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून मी दोन वर्षे काम केले. हे काम करीत असताना गुरुगोविंद सिंग महाविद्यालय, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, विद्यापीठातील माध्यम संकुल येथे तासिका तत्त्वावरती प्राध्यापक म्हणून काम करीत होतो. हे काम करीत असताना जिल्ह्यातील पत्रकारिता एक आदर्श निर्माण करून दिला. आजही ते कायम आहे. नांदेड येथे जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी हे होते. त्यावेळी कॉपीमुक्त अभियानात पत्रकार म्हणून डॉ. बालाजी शिंदे यांचा मोठा सहभाग आहे. जिल्ह्यातील विविध उपक्रमांमध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. देशोन्नती मध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना डॉ. शिवाजी दळणर यांची भेट झाली. बोलता - बोलता त्यांनी आमच्याकडे एक पत्रकारितेची जागा आहे, तुम्ही आमच्याकडे आला तर स्वागत, असे सांगून ते निघून गेले. त्यानंतर परीक्षा विभाग प्रमुख डॉ. वसंत भोसले यांनी या संदर्भात संपर्क केला, त्यानंतर मी स्वतः त्यांना भेटलो आणि किमान दोन तास चर्चा झाल्यानंतर मला महाविद्यालयात रुजू होण्यासाठी सांगितले. मी त्यांच्या सांगण्यानुसार दैनिक देशोन्नतीचा राजीनामा देऊन 2012 रोजी महाविद्यालयात रुजू झालो. मी एक वर्षमध्ये तासिका तत्त्वावर कार्यरत होतो. त्यानंतर 2013 मध्ये जाहिरात प्रकाशित करून माझी पर्मनंट नियुक्ती केली. या दरम्यान महाविद्यालयातील बातम्या, यूट्यूब चैनल आणि आणि विद्यार्थ्यांना इतर राज्यांमध्ये शिकण्यासाठी प्रवृत्त केले, या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक विद्यार्थी घडले आहेत. कोणी शासकीय नोकरीमध्ये आहेत, तर कोणी खाजगी चैनल मध्ये काम करीत आहेत. तर कोणी राजकीय प्रवक्ता म्हणून काम करीत आहेत. असा त्यांचा जीवन प्रवास असून ते गावाकडेही समाजसेवाच्या दृष्टिकोनातून अनेक कामे केली आहेत. त्यांची शैक्षणिक कार्य उल्लेखनीय आहे. त्यांचे दोन पुस्तके, 20 रिसर्च पेपर प्रकाशित झाले आहेत. सध्या ते रिसर्च गाईड असून त्यांच्याकडे चार विद्यार्थी पीएचडी करीत आहेत. तर एका विद्यार्थीनी पीएचडी मिळवली आहे. त्यांचा राज्यात मोठा जनसंपर्क आहे. त्यांची ओळख ही अष्टपैलू म्हणूनही ओळखले जाते.

# तरुण पिढीसाठी व्यायामाचे महत्त्व

आधुनिक केसरी

आजच्या योगात प्रत्येक वयात येणाऱ्या तरुण मुला मुलींना समाजात "मी प्रौढ झालो आहे "याची पोहोच द्यावी वाटते त्यासाठी बरेच तरुण मुल त्यांची तारुण्यातील ऊर्जा ही नको त्या गोष्टी करण्यामध्ये व नको ते व्यसन करण्यामध्ये खर्च करतात त्यामुळे आजकालचे पालक हे अतिशय चिंतेत असतात , मी आजपर्यंत फिटनेस क्षेत्रात काम करतांना कित्येक पालकांना भेटलो तेव्हा अस निदर्शनास येते की त्यांच्या मनामध्ये जेवढी चिंता पाल्यांच्या शिक्षणाला घेऊन असते तेवढीच चिंता ही त्यांच्या प्रकृतीला घेऊन असते कारण मुलं ज्यावेळेस तरुण होतात त्यावेळेस पालकांच्या अपरोक्ष बऱ्याच गोष्टींच्या व्यसनाधीन झालेले असतात व या बाबी ते पालकांपासून पद्धतशीर लपुन ठेवतात. म्हणुन बरेच पालक हे मुलांना व्यसना पासुन लांब ठेवण्यासाठी वाटेल ते करायला तयार असतात अशा परिस्थिती मध्ये व्यायाम हा सर्वात उत्तम पर्याय आहे मी गेल्या 15 ते 20 वर्ष्यांच्या फिटनेस क्षेत्रातील अनुभवा मध्ये एक महत्त्वाची गोष्ट पाहिली आहे आणि ती म्हणजे ज्या तरुण मुलांना व्यायामाची आवड लागते, त्यांच्या हळूहळू हे लक्षात येते की व्यायाम केल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढत आहे तसेच घरात व समाजात एक सन्मानपूर्वक वागणुक त्यांना भेटत आहे. ज्या वेळेस व्यायामाची आवड मुलांना लागते तेव्हा शरीर बनवण्यासाठी कुठल्या गोष्टी केल्या पाहिजेत व कुठल्या गोष्टी शरीराला हानिकारक आहेत हे आपोआप मुलांच्या लक्षात येते. तसेच व्यायाम केल्यानंतर वेळच्या वेळी उत्तम आहार केल्यामुळे वेळेचा योग्य वापर कसा केला पाहीजे हे ही अतिशय चांगले लक्षात येतेण् व्यायाम केल्याने तरूणांना त्यांच्या सामाजिक तसेच घरगुती जबाबदारीचीही तितकीच जाणीव होते. आजकाल तरुणांना व्यायामाची आवड लावण्यासाठी जिम हे अतिशय प्रभावी माध्यम बनले आहे. पालकांनी आपले मूल दिलेले पैसे नको ते व्यसन करण्यात खर्च न करता शरीरा साठी उपयुक्त गोष्टींसाठी त्या पैश्यांचा उपयोग कसा करतील याकडे लक्ष दिले पाहिजे. व्यायाम करताना SUPPLEMENT पाउडर चा जास्त वापर नको व्यायाम म्हंटल की आजकाल च्या पिढीला घरगुती आहारापेक्षा SUPPLEMENT पाउडर चा जास्त वापर करू वटतो . परंतु एक चांगलं शरीर बनेल एवढा चांगला आहात घरातून सुद्धा पुरवता येतो जसे की स्नायुंना ( MUSCLES ) ला PROTEIN ची गरज असते ते आपण चिकन , अंडी , मासे , पनीर , दूध , वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी यातून देखील पुरऊ शकतो ,तसेच वजन वाढवण्यासाठी व उर्जे साठी CARBOHYDRATES ची गरज भासते ते आपण फळे , बटाटे , रताळे , भात यामधून सुद्धा पुरवू शकतो म्हणुन एका प्राथमिक स्तरापरेंत SUPPLEMENT पाउडर घेणं टाळल पाहिजे अस मला वाटते.

**प्रथमेश जायभाये**
DIRECTOR : ARJFIT , STARLINE FITNESS EQUIPMENT MANUFACTURERS , MUMBAI
DIRECTOR : CURVEIT FITNESS STUDIO, BEED .



# जालन्याचे जितेंद्र अग्रवाल यांची ऐतिहासिक कामगिरी

## दक्षिण आफ्रिकेत कॉम्रेड मॅरेथॉन यशस्वीरित्या पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**डर्बन (द. आफ्रिका) :** जालना येथील व्यावसायिक व धावपटू जितेंद्र अग्रवाल यांनी दक्षिण आफ्रिकेत डर्बन येथे 9 जून रोजी कॉम्रेड मॅरेथॉन ही 87 किलोमीटरची स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करून इतिहास घडवला आहे.

या जगप्रसिद्ध व प्रतिष्ठित अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये धावणारे जालना येथील पहिले धावपटू होण्याचा मान 53 वर्षीय जितेंद्र अग्रवाल यांनी मिळवला आहे. 12 तासांत 87 किलोमीटर धावण्याचे लक्ष्य त्यांनी 11 तास 42 मिनिटे व 32 सेकदांत पूर्ण करून अनोख्या मनोबलाचे दर्शन घडवले आहे. या स्पर्धेत धावणे व ती पूर्ण करणे हे जगभरातील धावपटूंचे स्वप्न असते. याच डर्बन शहरात महात्मा गांधी यांचे काही काळ वास्तव्य होते हे विशेष.

या स्पर्धेसाठी जितेंद्र अग्रवाल जालना येथून 4 जून रोजी मुंबई व तेथून 5 जून रोजी सकाळी 4.30 वाजता डर्बनला विमानाने निघाले आणि संध्याकाळी 7 वाजता डर्बन येथे पोहचले. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातून जाणारे 40 सदस्य होते. अग्रवाल यांचे सातारा येथील प्रशिक्षक शिव यादव यांच्यासोबत हा संघ डर्बनला पोहचला. 6 जून रोजी सर्वांनी आराम केला. 7 व 8 जून रोजी दररोज अर्धा तास धावण्याचा सराव केला. 9 जून रोजी सकाळी 5.30 वाजता स्पर्धा सुरू होणार होती. त्यामुळे हे सर्व जण सकाळी 4.30 वाजता स्टार्ट पॉइंटला पोहचले.

जितेंद्र अग्रवाल यांनी सांगितले की, तेथील वातावरण अतिशय आल्हाददायक होते. रस्त्याच्या दुतर्फा लोक आम्हाला शुभेच्छा देत होते. संपूर्ण डर्बन शहरातील नागरिक मोठ्या संख्येने तेथे आले होते. ते त्यांच्या भाषेत गाणी गात होते आणि त्यामुळे वातावरणात नवचैतन्य संचारले होते.

पहाटे ठिक 5.30 वाजता स्पर्धा सुरू झाली आणि संध्याकाळी 5.30 वाजता पीटरमेरीबर्ग येथे संपन्न झाली. धावताना पूर्ण 87 किलोमीटर मार्गावर दोन्ही बाजूंनी लोक धावपटूंना प्रोत्साहन देत होते. भारतात जसा गणेशोत्सव उत्साहात साजरा होतो त्यापेक्षाही मोठा सण दक्षिण आफ्रिकेतील लोक कॉम्रेड मॅरेथॉनला साजरा करतात. पूर्ण मार्गावर लोक धावपटूंना पाणी, ज्यूस व खाद्यपदार्थ देत राहतात.

या स्पर्धेत 1800 मीटर चढाईचा मार्ग असल्यामुळे पूर्ण चढ चढून पुन्हा उतारावर धावायचे होते. या मार्गावर आजूबाजूचे निसर्गसौंदर्य अत्यंत अविस्मरणीय होते. हिरवेगार, डेरेदार वृक्ष, हिरवळ आणि पक्ष्यांचा किलबिलाट आमचा उत्साह वाढवत होता. ही स्पर्धा केवळ ईश्वराच्या कृपेने व जालनेकरांच्या शुभेच्छांमुळेच पूर्ण करू शकलो, असेही जितेंद्र अग्रवाल यांनी नम्रपणे नमूद केले. स्पर्धेत यश मिळवून त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला असून 13 जून रोजी ते जालना येथे परतणार आहेत.



**वेदनांवर केली मात :** स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात त्यांच्या उजव्या पायाच्या नसा आखडल्याने त्यांना प्रचंड वेदना होऊन धावणे अशक्य झाले होते . परंतु तरीही हार न मानता श्री गजानन महाराजांचे नामस्मरण करीत ते पुढे गेले आणि जवळच डाव्या बाजूला त्यांना डॉक्टरांचे पथक भेटले . त्यांनी तत्काळ अग्रवाल यांच्या पायाला विशेष पट्ट्या बांधल्या आणि लगेच वेदना थांबल्या . अग्रवाल यांनी मग मागे वळून न पाहता वेळेआधीच स्पर्धा पूर्ण करून भारताचा तिरंगा ध्वज मानाने फडकवला .

# केंद्रीय मंत्री खा. प्रतापराव जाधव यांचा दिल्ली येथे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** केंद्रीय मंत्रिमंडळात स्वतंत्र प्रभार देण्यात आलेले राज्यमंत्रीपदी खासदार प्रतापराव जाधव यांनी शपथ घेतल्यानंतर दिल्ली येथे त्यांचा युवा नेते अमोल काकड यांनी सत्कार केला. केंद्रीय मंत्रिमंडळात बुलढाणा जिल्ह्याला प्रथमच स्वतंत्र प्रभार असलेले केंद्रीय मंत्रिपद हा सन्मान मिळाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खंदे समर्थक असलेले खासदार प्रतापराव जाधव यांना स्वतंत्र प्रभाराचे मंत्रालय बहाल केले. भाजपचे युवा नेते अमोल काकड यांनी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दीपक बोरकर,ज्येष्ठ नेते धनशीराम शिंपणे, आदींची उपस्थिती होती.





# महेश नवमीच्या उत्सवाला उत्साहात सुरुवात

## 15 जून रोजी निघणार भव्य शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महेश नवमीच्या शुभमुहूर्तावर माहेश्वरी युवक मंडळ व माहेश्वरी महिला मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांच्या स्मरणार्थ दाताळा येथील बिग बुल टर्फ येथे बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये एकूण 95 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये महिला आणि पुरुष दोघांनीही सहभाग घेतला. लहान मुले आणि महिलांसाठी लिंबू शर्यत, बोरी शर्यत, स्लो सायकलिंग आणि बॅडमिंटन यासारखे मजेदार उपक्रमही आयोजित करण्यात आले होते ज्यात सुमारे 50 सदस्यांनी सहभाग घेतला होता. याशिवाय कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धाही घेण्यात आल्या ज्यात ५० सदस्यांनी सहभाग घेतला. बॉक्स क्रिकेटचे प्रोजेक्ट डायरेक्टर योगेश तोष्णीवाल, पियुष माहेश्वरी, मोहित कासट, स्वाती माहेश्वरी, बॅडमिंटनचे प्रोजेक्ट डायरेक्टर मुकेश भट्टड आणि विपिन भट्टड, रेणुका राठी, राधा भट्टड इतर स्पर्धांचे प्रोजेक्ट डायरेक्टर वेदांत जाजू विक्रम बंग आणि विष्णू भट्टड, मोनिका भट्टाड, विष्णू भट्टड, विष्णू भट्टड. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. या सर्व कार्यक्रमांमुळे महेश नवमीचा उत्सव आणखीनच रंगतदार आणि आनंदी झाला. सर्व सहभागी व आयोजकांचे सहकार्य वाखाणण्याजोगे होते. विदर्भ विभागीय माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष मा.श्री.दामोदर जी सारडा, जिल्हाध्यक्ष शिवनारायण जी सारडा, तालुकाध्यक्ष उमेशजी चांडक, सेवा समिती सचिव सुरेशजी राठी, तहसील सचिव राजेशजी काकाणी, महिला मंडळ माजी अध्यक्षा इंदुदेवी जाजू, युवा संघटनेचे रुपेश राठी, ऋषिकांत जखोटे, युवा मंचचे अध्यक्ष मा. अध्यक्ष शक्तीजी धूत, प्रभाकरजी मंत्री, श्रावणजी मंत्री सुधीरजी बजाज तसेच समाज बांधव सर्वश्री राजकुमार जाजू, मनोजजी जाजू, गिरीशजी चांडक, ललितजी कासट आदी उपस्थित होते. समाजाच्या वतीने 15 जून रोजी शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली लक्ष्मी नारायण मंदिराजवळून सायंकाळी ५ वाजता सुरू होणार आहे.

# जनसामान्यांच्या समस्या प्राधान्य क्रमाने सोडवा : विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे ब्रम्हपुरी मतदार संघातील सिंदेवाही तालुक्यातील अनेक विकास कामे ठप्प होती. या विकास कामांना शीघ्र गतीने पुर्ण करुन जनतेच्या समस्या तातडीने सोडवा असे निर्देश राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी सिंदेवाही येथिल विश्राम गृह येथे आयोजित सभेत दिले.

आयोजित आढावा सभेस सिंदेवाही तहसीलदार पानमंद, गटविकास अधिकारी सुकरे,वैद्यकीय अधिकारी झाडे, पोलिस निरीक्षक तुषार चव्हान,काँग्रेस तालुका अध्यक्ष रमाकांत लोधे, काँग्रेस शहराध्यक्ष सुनिल उट्टलवार नगराध्यक्ष स्वप्नील कावळे,विरेंद्र जयस्वाल,राहुल पोरेडीवार,महीला आघाडी अध्यक्ष सिमा सहारे, सरपंच राहूल बोडणे,नगर पंचायत पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते,तथा सर्व विभागाचे अधिकारी व सरपंच तसेच पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणंद रस्ते योजना, घरकुल योजना, अंगणवाडी व शालेय वर्ग खोल्या बांधकाम, नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्राम पंचायत भवन इमारत बांधकाम, पाणी पुरवठा अंतर्गत जल जीवन योजना, तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांची भरती, जिल्हा परिषद सिंचाई विभागाची विकास कामे, वनविभाग , जलसंधारण विभाग, आरोग्य विभाग,भूमी अभिलेख विभागा अंतर्गत सावली शहरातील मोजणी, महसूल विभाग,तालुका क्रीडा



संकुल, नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत सुरु असलेली विकास कामे, , कंत्राटदारांनी केलेल्या चुका, झालेले शेतकर्यांचे नुकसान तथा अन्य योजनांचा विस्तृत आढावा विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रं आमदार विजय वडेट्टीवार यांनी घेतला. नुकतीच आटोपलेल्या लोकसभा निवडणुक कार्ग्रमाअंतर्गत लागू असलेली आचारसंहीता यामुळे विकास कामे ठप्प पडली होती. तर येणारा हंगाम हा पावसाळी हंगाम असुन यातुन सिंदेवाही तालुक्यातील शेतकरी, सामान्य नागरिक यांना भेडसावणाऱ्या समस्या प्राधान्य क्रमाने सोडवीण्यात याव्या. तसेच विकास कामांचा दर्जा उत्तम ठेवून कामे तातडीने पुर्ण करावे. तसेच विकास कामांत हयगय व दुर्लक्ष्य करणाऱ्या अधिकारी असो अथवा कंत्राटदार यांची गय केल्या जाणाऱ्या नाही अशी तंबी देखील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. याप्रसंगी प्रामुख्याने संबंधित विभागाचे सर्व अधिकारि, नगर पंचायत पदाधिकारी, नगरसेवक , सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावंगी -शेखपूर शिवारात ढगफुटी, तासभर पाऊस, नाले पाण्याने तुडुंब

## लागवडीचे तीन तेरा : दुबार लागवड; शेतात वाहिले पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी व शेखपूर शिवारात दि.११ मंगळवारी दुपारी अचानक पाऊस सुरु झाला होता पावसाने जोर धरला व बघताबघता धुवांधार पावसाला सुरुवात होवून तासभरात शेतशिवारात पाणी च पाणी झाले शेतीला नदीनाल्याचे स्वरुप आले तर नाले तुडुंब पाण्याने भरून वाहीले. शेतकरी गत दोनतीन दिवसांपासून मृग नक्षत्राच्या पावसा नंतर लागवड पेरा करुन होते. तर दि ११रोजी सकाळीच कडक उन्ह ढगाळ वातावरण हवामान पावसाचा अंदाज होताच व दुपारी सुरुवातीला हळुच पाऊस सुरु झाला मात्र अचानक पावसाचा इतका जोर वाढला की काही दिसेनासे झाले व तासभर जाड मोठा जोराचा पाऊस झाला.यात लागवड पेरा केलेले बि बियाणे वाहून गेले ठिकठिकाणी शेती फुटून गेली शेताला नदी पुराचे स्वरुप आले होते.तर नाले तुडुंब भरून वाहत होती. नाल्यातून इकडून तिकडे जाणे शक्य होत नव्हते.एकुण ढगफुटी पावसाने शेती व लागवड पेरा चा तीनतेरा नऊ अठरा वाजवले. प्रत्यक्ष उपस्थित शेतकऱ्यांनी आप बीती दैनिकाच्या प्रतिनिधी ला सांगितली. महसुल विभागाने ढगफुटी सदृष्य स्थीतीची पाहणी करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.





# वीज पडून दोन शेतकऱ्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील मूर्तिजापुर तालुक्यामध्ये वीज पडून दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. जिल्ह्यात यंदा उन्हाचा पारा चांगलाच चढला होता. गेल्या दोन-तीन दिवसापासून उन्ह व सावलीचा खेळ सुरू आहे. दरम्यान, सोमवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुमारे एक तासापर्यंत पावसाचा जोर कायम होता. सर्वत्र पावसाने हजेरी लावली. त्यानंतर आज सकाळपासून पुन्हा उन्हाचा पारा चढला होता. दिवसभर उन्ह चांगलेच तापल्यानंतर सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. रात्री उशीरापर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाचा जोर कायम होता. दरम्यान, जिल्ह्यामध्ये वीज पडून दोन जणांचे मृत्यू झाले आहेत. मूर्तिजापूर तालुक्यातील मौजे खापरवाडा येथील शुभम राजेंद्र टापरे (२६) हे शेतात मृत अवस्थेत आढळून आले. वीज पडून त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दुसऱ्या घटनेत मूर्तिजापूर तालुक्यातील टीपराळा येथील शालिग्राम श्रीराम डोंगरे (६५) हे त्यांच्या शेतात झाडाखाली थांबले असताना सायंकाळी त्यांच्या अंगावर वीज कोसळली. यामध्ये त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. याबाबत ब्रह्मी खुर्द येथील तलाठी यांनी अहवाल दिला आहे. प्रशासनाकडून दोन्ही घटनांचा पंचनामा करण्यात आला. दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या नागपूर येथील केंद्रातर्फे अकोला जिल्ह्यात ११ ते १६ जूनदरम्यान विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ५० किमी असेल, असा अंदाज आहे.

# धर्माबाद तालुक्यातील 14000 हजार विद्यार्थ्यांना मोफत मिळतील पाठ्यपुस्तके !

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या धर्माबाद तालुक्यातील 14000, हजार विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत. धर्माबाद तालुक्यामध्ये गटशिक्षण कार्यालय येथे पुस्तकांचा संच दाखल झाला आहे.

15 जून रोजी शाळा सुरुवात होताच 14000,हजार विधार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात येणारे आहे. असे गटशिक्षणाधिकारी मार्कंडेय यांनी सांगितले आहे.धर्माबाद तालुक्यामध्ये पुस्तकांच्या १०० टक्के साठा दाखल झालेला आहे.धर्माबाद तालुक्यात शाळांची १५ जून रोजी घंटा वाजणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आलेले आहे. त्यादृष्टीने धर्माबाद जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हापरिषद शाळा 56 तर खाजगी अनुदानित शाळा 29 जिल्हापरिषद व खाजगी शाळांमधल्या 14000,हजार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात येणार आहे.धर्माबाद तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या 14000, हजार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक देण्यात येणार आहे.

15/06/22 रोजी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकासह शिक्षक सर्व उपस्थित राहावे . अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाही करण्यात येईल, सर्व शाळांमध्ये शै .वर्ष 2024-2025 प्रवेश उत्सव साजरा करावा ., शाळेच्या पहिल्याच दिवशी उपलब्ध मोफत पाठ्यपुस्तके वाटप करावेत, पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्यांसाठी शा .पो .आ .शिजवण्यात यावा त्यामध्ये काही तरी गोड पदार्थ असावा, शाळेत पिण्याच्या पाण्याची उत्तम व्यवस्था असावी . तसेच वृक्षारोपणाची पूर्व तयारी करावी . असे सक्त निर्देश देण्यात आले . **मर्कंडे रविशंकर, गटशिक्षणाधिकारी**



# जय मल्हार सेनेच्या अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्षपदी ॲड. सोमनाथ गांगले

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जय मल्हार सेनेच्या अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्षपदी ॲड. सोमनाथ गांगले यांची निवड झाली आहे. जय मल्हार सेनेचे सरसेनापती लहुजी शेवाळे हे अहमदनगर येथे आले असताना त्यांनी जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये ॲड. सोमनाथ गांगले यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील जय मल्हार सेनेचे तालुकाध्यक्ष व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. सोमनाथ गांगले हे नेवासा येथील रहिवासी असून ते नेवासा येथील न्यायालयात गेल्या अनेक वर्षांपासून वकिली व्यवसाय करीत आहेत. त्यांचा दिवाणी व फौजदारी खटले निकाली काढण्यामध्ये विशेष हातखंडा आहे. आपल्या वकिली पेशाचा उपयोग धनगर समाजातील गोरगरीब कुटुंबावर होणारा अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी आपण करणार आहोत असे त्यांनी निवडीनंतर जाहीर केले. जय मल्हार सेनेचे सरसेनापती लहुजी शेवाळे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल सूनीलराव गडाख, शिवाजीराव दरंदले, सोमनाथ कराळे, दुर्योधन सोनवणे, माणिक कर्डिले, सुनील वीरकर, वसंत बारगळ, अर्जुन ओहोळ, अशोक कर्डिले, रविराज तलवार, डॉ. नामदेव पंडित, खंडागळे गुरुजी, दत्तात्रय कर्डिले, सोपान वीरकर, जालिंदर चेमटे, अशोक मिसाळ, आदींनी अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्याचा पाण्यात बुडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** रेल्वे बोगद्यात साचलेल्या पाण्यातून बैलगाडी काढत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने बैलगाडी बुडू लागल्याचे पाहून बैलांना वाचविण्यासाठी शेतकऱ्याने त्यांच्या दोऱ्या सोडल्या. बैल बाहेर आले. परंतु, पोहता येत नसल्याने शेतकऱ्याचा बुडून मृत्यू झाला. मंगळवारी ही घटना घडली. जळगाव शहरापासून सात ते आठ किलोमीटरवरील आसोदा गावात सुकलाल माळी (६३) हे पत्नी, मुलगा आणि सून यांच्याबरोबर वास्तव्याला होते. शेतीची काम करून ते उदरनिर्वाह करीत होते. जळगाव जिल्ह्यात सोमवारी सायंकाळपासून पहाटेपर्यंत विजांचा कडकडाट, मेघगर्जनेसह मंगळवारी पहाटेपर्यंत मुसळधार पाऊस झाला. मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास सुकलाल माळी हे बैलगाडीने मन्यारखेडा रस्त्यावरील शेतात जाण्यासाठी निघाले. रस्त्यावर रेल्वेचा बोगदा आहे. पावसामुळे या बोगद्यात पाणी साचले होते. त्यावेळी पलीकडे जाण्यासाठी माळी यांनी बैलगाडी बोगद्याखाली साचलेल्या पाण्यातून टाकली. पावसामुळे बोगद्यात पाणीच पाणी साचले होते. त्यात माळी यांना पाण्याचा अंदाज न आल्याने बैलगाडीसह ते पाण्यात बुडाले.

# नंदुरबारचे मेजर रमेश वसावे यांना वीरमरण

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** शहादा तालुक्यातील घोडलेपाडा येथील




सैन्यदलातील जवान मेजर रमेश सजन वसावे यांना राजस्थानमधील अजमेर या ठिकाणी वीरमरण आले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी शासकीय इतमामात घोडलेपाडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शहादा तालुक्यातील मंदाणे येथून तीन किलोमीटरवर घोडलेपाडा हे संपूर्ण आदिवासी लोकवस्तीचे गाव आहे. बाराशे लोकवस्तीचा घोडलेपाडा चांदसैली ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट आहे. या पाड्यातील आदिवासी शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मेजर रमेश वसावे यांना १० जून रोजी दुपारी कर्तव्यावर असताना अपघाती वीरमरण आले. त्यांनी पहिली ते दहावीपर्यंत सुलतानपूर येथील शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेतले. अकरावी व बारावी शहादा येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयात केल्यानंतर सैन्यदलात भरतीसाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. २००५ मध्ये त्यांची केंद्रीय राखीव पोलीस दलात निवड झाली. पहिली नेमणूक जम्मू काश्मीर, त्यानंतर दिल्ली, चंदीगड, झारखंड, राजस्थानमधील भिलवाडा या ठिकाणी झाली. काही दिवसांपूर्वी त्यांची झारखंडमध्ये बदली झाली होती. त्यामुळे त्यांची पत्नी आणि मुले दोन दिवसांपूर्वीच गावी परतले होते. रमेश झारखंडमध्ये बदलीच्या ठिकाणी रुजू होणार होते. भिलवाड्याजवळ त्यांच्या दुचाकीची मालमोटारीशी धडक झाली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. मेजर वसावे यांच्या वडिलांचाही एका अपघातात मृत्यू झाला आहे. रमेश वसावे हे कुटुंबात ज्येष्ठ असल्याने आई, लहान दोन भावंडे, तीन बहिणी यांची जबाबदारी वडिलांनंतर त्यांच्यावर आली. मेजर वसावे यांना दोन मुलगे असून मोठा मुलगा तन्मय हा आठवीत नंदुरबार येथे तर दुसरा मुलगा नैतिक हा शहादा येथील विकास हायस्कूल येथे सहावीत आहे. पत्नी सीता या गृहिणी आहेत. भावाच्या मुलीला साक्षी त्यांनी दत्तक घेतले असून ती चौथीत आहे. मेजर वसावे यांचे पार्थिव बुधवारी सकाळी गावी पोहोचल्यानंतर शासकीय पद्धतीने अंतिमसंस्कार करण्यात आले. सीआरपीएफच्या वतीने हवेत तीनवेळा गोळी झाडत अखेरची मानवंदना देण्यात आली. पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने शहादा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक शहादा, जिल्हा सैनिकी अधिकारी आदींनी पुष्पचक्र अर्पण केले.

# नरेंद्र मोदी शपथ ग्रहण सोहळ्याचा धर्माबादमध्ये भाजपाकडून जल्लोष!

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती



भवनात शपथ ग्रहण केली. त्या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी धर्माबाद मध्ये भाजपा कडून मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. आमदार राजेश पवार यांच्या जनसंपर्क कार्यालयापासून बँड बाजासह रॅली काढत कार्यकर्ते हुतात्मा पानसरेचौकात जमा झाले. फटाक्याची आतिषबाजी करून व घोषणा देत जल्लोष साजरा केला. यावेळी धर्माबादमधील सर्वात ज्येष्ठ भाजपा कार्यकर्ते श्रीनिवास इनानी शेठ, भाजपा तालुका अध्यक्ष विजय डांगे, रवींद्र पोतगंटीवार, एनडीए आघाडीचे अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक वर्णी नागभूषण, डॉ. कमल किशोर काकांनी, साईनाथ शिरपूरे, पिराजी पा.चव्हाण, सतीश मोटकुल, विजयकुमार राठौर, सुमलता पटकुटवार, सज्जन गड्डोड यांच्यासह सर्व महायुतीचे पदाधिकारी, शेकडो का कार्यकर्ते उपस्थित होते.

# मृग नक्षत्राच्या पावसाने पुल कामांची ' ऐसी की तैसी'

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी पुल कामे अपूर्ण स्थीतीत असल्याने व मृग नक्षत्राने सुरुवाती पासूनच चारपाच दिवस पासून सतत जोरदार पाऊस होत असल्याने तात्पुरत्या रस्त्याला घेवून वाहनधारक नागरिक व ठेकेदाराचे हाल हाल सुरु असल्याचे चित्र आहे. उन्हाळ्यात सुरु झालेले पुल कामे संथ गतीने चालढकल अनियमितता बंद चालू प्रक्रिया करत कामे रेंगाळले व आता ऐन पावसाळ्यात नागरिकांना नाहक्क त्रास सहन करावे लागत आहे. पावसाळा ऐन वेळी सुरु होवून गत चारपाच दिवसापासून सातत्याने पावसाने लावून धरले आहे. पुलकाम दरम्यान तात्पुरते केलेल्या रस्त्यांवर ये जा करतांना नागरिकांची दमछाक पडझड फसाफसी होत असल्याने मोठा त्रास नागरिकांना सहन करावे लागत आहे. त्यात ठेकेदार दररोज मुरुम टाकत आहे पण पाऊस दररोज येत पाठपिछा करत आहे यात नागरिक व ठेकेदाराचे हाल होत आहे.हे खेळ कुठ पर्यंत सुरु राहणार कारण सावंगी सर्कलमध्ये ठिकठिकाणी १५-२०पुलांची कामे सुरू आहेत व ती अपुर्ण आहे नुकतेच पावसाळा बघता कामांनी वेग घेतला होता परंतु पाऊस आहे तो कामच बंद करून परेशान करुन सोडत आहे. विभागाने तातडीने लक्ष देवून कामे पुर्ण करावे व नागरिक ये जा साठी सवलत सुविधा उपलब्ध करून द्यावी असी मागणी नागरिकांतून होत आहे.

# अकोला जिल्ह्यात मुसळधार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास कोसळला. काल रात्री देखील सुमारे एक तास जोरदार पाऊस झाल्याने सर्वत्र जलमय वातावरण झाले आहे. हवामान तज्ज्ञांनी जिल्ह्यात मोसमी पाऊस दाखल झाल्याचा अंदाज व्यक्त केला. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी सुखावले आहेत.जिल्ह्यात यंदा उन्हाचा पारा चांगलाच चढला होता. उष्णतेच्या लाटेचा जिल्ह्याला फटका बसला आहे. जिल्ह्यातील तापमानाने ४५ अं.से.चा टप्पा देखील ओलांडला. गेल्या दोन-तीन दिवसांपासून उन्ह व सावलीचा खेळ सुरू आहे. दरम्यान, सोमवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुमारे एक तासापर्यंत पावसाचा जोर कायम होता. सर्वत्र पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे अनेक भागांतील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. शहरातील अनेक भागांत रात्रभर वीज पुरवठा नव्हता. पावसामुळे वीज यंत्रणेत बिघाड झाला असून दुरुस्तीचे कार्य सुरू होते.

आज सकाळी ८ वाजेपर्यंत जिल्ह्यात सरासरी ९.७ मि.मी. पाऊस पडल्याची नोंद झाली. सर्वाधिक २५.६ मि.मी. पाऊस बाळापूर तालुक्यात पडला, तर अकोला तालुक्यात देखील १८.९ मि.मी. पाऊस झाला आहे. याशिवाय अकोट तालुक्यात ४.९ मि.मी., तेल्हारा २ मि.मी. व मूर्तिजापूर तालुक्यात ७.३ मि.मी. पाऊस पडला. पातूर व बार्शिटाकळी तालुक्यात पावसाची नोंद झाली नाही. सामान्य सरासरीच्या तुलनेत जिल्ह्यात आतापर्यंत ७६.७ टक्के पाऊस झाला आहे. दिवसभर उन्ह चांगलेच तापल्यानंतर सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सुमारे दीड तासांपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाचा जोर कायम होता. या पावसामुळे अनेक भागात पाणी साचले असून नाल्यांमधील पाणी रस्त्यावर आले आहे. वादळी वाऱ्यामुळे वृक्ष उन्मळून रस्त्यावर पडले.

# कृउबा समितीच्या भ्रष्टाचाराची व्याप्ती कोट्यवधीत : सभापती गंगाधर बोर्डीकर

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये तत्कालीन मुख्यप्रशासका सह सर्व प्रशासक मंडळाने केलेल्या कथित भृष्टचाराची व्याप्ती ही कोट्यावधीच्या घरात असल्याची माहिती खुद्द मार्केट कमिटीचे सभापती गंगाधर बोर्डीकरांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. विशेष बाब म्हणजे या सर्व कोठ्याधीच्या कथित आर्थिक गैरव्यवहारात मार्केट कमिटीचे सचिवांचाही समावेश असल्याने सदरील या भ्रष्ट कारभाराची साखळी वाढत गेली.या सर्व प्रकारा मुळे तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.या सर्व सिद्ध झालेल्या भृष्ट कारभारा पाढा फक्त एक वर्षाचाच आहे.सदरील अशासकीय मंडळ तब्बल अडीच वर्षे कार्यरत होते.तेंव्हा अजून उर्ववीत दीड वर्षाच्या कारकिर्दीत पुन्हा कोट्यवधींचा भ्रष्टाचार बाहेर मोठ्या प्रमाणावर उघड होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत गंगाधर बोर्डीकरांनी दिली. सदरील पत्रकार परिषदेत मार्केट कमेटी मध्ये उघड झालेला भ्रष्टाचार त्यांच्याच माजी एका नगरसेवकासह काही कार्यकर्त्यां लेखी दाव्या मुळे हे पितळ उघडे झाले असेही सांगितले.

या बाबत त्यांनी शहरातील श्री.संत सावळा इलेक्ट्रिकलची दाखवण्यात आलेली बिले ही 6 लाख 61 हजार व 31 हजार 690 रु अशी एकूण 6 लाख 92 हजार 690 रुच्या भ्रष्टाचारा सह एस.एल.इलेक्ट्रिकलच्या 9 लाख 54 हजार 70 रु अशी बनावट बिले दाखवण्यात येऊन भ्रष्टाचार केला.काही व्यापाऱ्यांनी प्रत्यक्ष पत्रकार परिषदेत असा खुलासा केला की आमच्या कडून 20 ते 21 लाख रु घेऊन अद्याप भूखंड दिलेले नाही.असा बॉंब फोडला. तब्बल 40 भूखंडाचे 20 ते 21 लाख रु घेऊन 8 कोटी 80 लाखाचा भ्रष्टाचार झाल्याचा अंदाज व भीती व्यक्त केली गेली. येलदरी व वरुड (नृ) मार्गावर बांधलेले गाळे सुध्दा कोणतेही नियम न बघता फक्त भ्रष्टाचार करण्यासाठी घेतलेलाच निर्णय होता हे सुद्धा सिद्ध झालेला आहे कारण सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरील अतिक्रमण काढून घेण्यासाठी वेळोवेळी सूचना करून मी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. पत्रकार परिषदेत तत्कालीन मंडळाने मॅट पडदे धुण्याचा खर्च तब्बल 47 हजार 590 रु दाखवून अक्कलेचे तारे तोडले असून मार्केट कमिटीतील भ्रष्टाचार म्हणजे माकडाच्या हातात कोलीत दिल्या वर काय होते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे हा झालेला मोठा आर्थिक गैरव्यवहार असल्याचे सांगितले.



# वाघाच्या हल्ल्यात २ गोऱ्हे ठार

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** शेतात बांधून असलेल्या जनावरांवर वाघाने हल्ला चढवून २ गोऱ्हे ठार केले. तर वाघाने पंजा मारल्याने २ गाई जखमी झाल्यात. मात्र, हा बिबट असल्याचे वनाधिकारी सांगतात. ही घटना सेलू तालुक्यातील जामनी शेतशिवारात आज मंगळवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास उघडकीस आली. यात शेतकरी नानाजी ढोडरे रा. जामनी यांचे ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. नानाजी ढोडरे यांची मौजा जामनी शिवारात शेती असून त्यांच्याकडे जनावरेही आहेत. ते आपली सर्व जनावरे शेतातच बांधून रात्रीला जागलीलाही राहतात. सोमवारी ते सायंकाळी जनावरांना बांधून चारापाणी करून घरी आले होते. मात्र, काल ते काही कारणामुळे शेतात गेले नव्हते. मंगळवारी सकाळी शेतात गेले असता त्यांना वाघाने २ गोरे मारल्याचे व २ गाईना जखमी केल्याचे दिसून आले. ही घटना मध्यरात्री १ ते दीड वाजताच्या सुमारास घडली असावी असा अंदाज लावल्या जात आहे. क्षेत्र सहायक घनश्याम टाक यांनी आपले सहकारी वनरक्षक मनोहर ढाले यांना सोबत घेऊन पंचनामा केला.






# जिंतूर बसस्थानक समस्यांचे माहेरघर

आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर

**जिंतूर : सध्या उन्हाच्या त्रासाने सर्वच नागरिक प्रवासी ग्रस्त असल्याने दुपारी 12:00 ते 05:00 या वेळेत आवश्यक असल्यास बाहेर पडताना दिसतात अशातच जिंतूर बस स्थानकात मात्र प्रवाशांना त्रास सहनकरावा लागत असून अधिकारी मस्त प्रवास त्रस्त अशी अवस्था पहावयास मिळते. याबाबत माहिती अशी की जिंतूर बस स्थानक हे परभणी विभागातील पहिले आगार आसून या ठिकाणाहून अनेक लांब पडल्यांच्या व ग्रामीण भागातील बसेस एजा करत असतात त्यातच उन्हाचे दिवस असल्यामुळे अनेक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून याकडे अधिकारी मात्र खुर्चीत मस्त असून प्रवाशांचा त्रास त्यांना दिसत नाही का ? असा सवालही प्रवासी वर्गातून एकावयास मिळतो.**

जिंतूर बस स्थानकावर नेमून दिलेल्या ठिकाणी (पॉईंटवर) बस लागत नसल्यामुळे चालकांच्या मनाप्रमाणे कोणती बस कुठे ही लागत असल्याने याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसून येते. पर्यायाने प्रवाशांना ज्या ठिकाणी जायचे आहे ती बस कुठे लागते यासाठी प्रवासी निवा-यात न बसता कोणतीही बस लागल्यास ती आपल्यासाठीच ! पाहण्यासाठी त्याकडे धाव पळ करत बस कडे धाव घ्यावी लागते व प्रत्येक बस आगारातून आल्यास ती आपल्या गावाकडीलच असेल म्हणून धावपळ करून बस कडे धावतात.अगारातून आलेली बस ही कोणत्या गावाला जाणार त्यावर पाटी बोर्ड लावलेला नसतो. त्यामुळे प्रत्येक बस कुठे जाणार प्रवाशाला माहिती नसल्याने लागलेली बस कुठे जाणार हे पाहण्यासाठी प्रत्येक बस कडे प्रवासी धावपळ करून वाहकांना किंवा चालकांना विचारावे लागते.

जिंतूर बस स्थानकात प्रवासी संघटना कार्यरत असून संघटनेचेही याकडे दुर्लक्ष दिसून येते तर संघटनेचे पदाधिकारी कर्मचारी व अधिकारी यांचे हार तुरेच देणे घेण्यात व्यस्त दिसतात. प्रवाशांची हितांचे काय ? असा प्रश्नही प्रवाशांना पडलेला दिसतो.

**बस स्थानकातील अनेक सुविधा पासून प्रवासी वंचित** : जिंतूर बस स्थानकात अनेक असुविधांचा अभाव पाहावयास मिळतो . त्यात स्थानकात गेली कित्येक वर्ष पाण्याची सुविधा नाही . पंखेही लावलेले नाही . एकच पंखा चालू असला तरी तो केवळ वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू असेपर्यंत चालू असल्याने रात्री बस स्थानकात थांबलेल्या प्रवाशांना मच्छरांचा सामना करावा लागतो . त्यातच बस स्थानक परिसरात सर्वत्र दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पहावयास मिळते , त्यामुळे मच्छरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने प्रवचना त्यांचा त्रास सहन करावा लागतो . ग्रामीण भागातून आलेल्या लेकरवाळी महिलांनाही आपल्या बाळाला दूध पाजणे ही प्रक्रिया उघड्यावरच करावी लागते . त्यांना स्तनदा कक्ष कुठेच दिसून येत नाही . त्यातच काही कर्मचाऱ्यांनी नाव न घेण्याच्या अटीवर आम्हाला आराम रूम देखील नसल्याने चालक वाहकांना थांबणे ही अवघड झाल्यांची सांगितले .



**यूपी आय तिकीट कधी सुरू होणार** : सध्या महाराष्ट्रात महामंडळाने प्रवाशांना चिल्लरचा त्रास होऊ नये यासाठी यूपीआय कोड द्वारे पेमेंट पद्धती सुरू केली असून त्यांची जाहिरात महामंडळाच्या बस वरही पाहावयास मिळते . परंतु जिंतूर आगाराला त्याचे वावडे आहे की काय ? असा प्रश्नही प्रवाशांना पडलेल्या दिसून येतो .

**लाखो रुपयांच्या बस गेट नसलेल्या आगारात** : जिंतूर आगारात लाखो रुपयांच्या बस आगाराला गेटच नसल्याने व त्यात त्यासाठी एकच वाचमन रात्री आगारास मेन गेटच नादुरुस्त असल्याने ते कधीच बंद करता येत नसल्याने आगारांचा कारभार "रामभरोसे" असाच म्हणावयास हरकत नाही . बसेस उभ्या असताना दिसून येतात या सर्व बाबीकडे वरिष्ठांना लक्ष देण्यासाठी वेळ मिळेल का ? असा प्रश्नही प्रवासी व जिंतूरच्या नागरिकांना पडलेला दिसतो .

# आरक्षण मिळत नसल्याने आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** हिंगोलीत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आणखी एक बळी गेल्याची घटना घडली आहे. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या हिंगोलीच्या औंढा नागनाथ तालुक्यातील वडध येथील बालाजी सुधाकर नेव्हल, वय वर्ष ३५ या तरुणांनी आरक्षण मिळत नसल्याच्या निराशेत जात, टीव्ही केबल वायरनी आपल्या राहत्या घरात गळफास घेत आयुष्य संपवले आहे. काल रात्री उशिराने हट्टा पोलीस स्टेशनमध्ये दुर्घटनेची नोंद करण्यात आली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून जिल्ह्यामधील ही पंधरावी घटना असल्याचे धक्कादाय वास्तव समोर आलं आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बालाजी यांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. आरक्षणासंदर्भात सरकारकडून कुठलाही ठोस निर्णय घेतला जात नाही आपल्या पुढील पिढीच्या लेकरांच्या भवितव्याचे काय होणार चिंतेने बालाजी व्यतीत होते आणि त्यांनी टोकाचे पाऊल उचले असे त्यांनी स्वःत चिठ्ठीत लिहले आहे. काल रात्रीच्या सुमारास सर्व कुटुंबाने जेवण आटोपल्यानंतर साधारण दहा वाजताच्या दरम्यान त्यांनी लोखंडी खिडकीच्या जाळीला केबल लावून गळफास घेतलाय असा प्रकार कुटुंबाच्या लक्षात आला. घटनेनंतर कुटुंबाने आरडाओरडा केला आणि बालाजीला तातडीने रुग्णालयात नेले,पण डॉक्टरांनी बालाजी यांना मृत घोषित केले. गोविंद नेव्हल यांनी हट्टा पोलिसांना घटनेची माहीती दिली.यावरून हट्टा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक गजानन बोराटे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी येऊन पाहणी केली. पोलिसांना पंचनामा करताना जीवनसंपवण्याआधी लिहलेली चिठ्ठी सापडली. पोलिसांनी रितसर पंचासमक्ष पंचनामा केला असता बालाजी यांच्याकडे एक चिठ्ठी आढळून आली. बालाजी यांनी चिठ्ठीत लिहलंय "मी बालाजी सुधाकर नेव्हल मला दोन मुले आहेत. माझ्या मुलाच्या पुढील शिक्षणाच्या भविष्यासाठी मराठा आरक्षण सगे सोयरे सरकारने माननीय मनोज दादा जरांगे पाटील उपोषणाला बसलेले असून सरकारने सगे सोयरे कायदा लागू न केल्याने मी माझे जीवन संपवत आहे "एक मराठा लाख मराठा" अशा पद्धतीचा चिठ्ठीवर मजकूर लिहून त्यांनी आपल जीवन संपवल. चिट्ठी पोलिसांनी पंचासमक्ष तपासासाठी हस्तगत केली असून आकस्मित मृत्युची नोंद पोलिसांनी केली आहे. या घटनेचा पुढील तपास जमादार कोकरे यांच्याकडून केला जात आहे. मयत बालाजी यांना दोन मुले पत्नी आई-वडील असा परिवार आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# गिरडाघाटात धनिक मायक्रो फायनान्सच्या कर्मचाऱ्यांना लुटणारे चोरटे जेरबंद

## सपोनि प्रफुल्ल साबळे यांची धडाकेबाज कारवाई; चार तासांत चोरट्यांच्या आवळया मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पिंपळवाडी येथून हाकेच्या अंतरावर असलेल्या गिरडाघाटात धनिक मायक्रोफायनान्सच्या वसुली कर्मचाऱ्यांना गिरडा घाटात दरोडेखोरांनी लुटून मारहाण केल्याचा खळबळजनक प्रकार घडला असता फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चार तासात सहा चोरट्यांना जेरबंद करण्यात यश आले आहे.१०/६/२४ रोजी जूनच्या रात्री १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. घटनास्थळ गिरडा सावळदबारा गावापासून ६ ते ७ किलोमिटर अंतरावर असून ते सोयगाव तालुक्यातील फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येते.

प्राप्त माहितीनुसार पंजाब थिगळे, धीरज शातम आणि संघानंद इंगळे हे धनिक मायक्रोफायनान्स चे कर्मचारी काल, १० जून रोजी टिटवी,सावळदबारा परिसरात कर्ज वसुलीसाठी गेले होते. रात्री बुलडाणा येथे परत जात असताना त्यांना उशीर झाला. तिघे दोन मोटरसायलने बुलडाण्याकडे जात होते. दरम्यान टिटवी येथून काही जणांकडून कर्ज वसूल करून तिघे गिरडा घाट चढून वर येत होते. त्याचवेळी घाटातील महादेव मंदिराजवळ दबा धरून बसलेल्या ५ ते ६ जणांनी तिघांवर एकाकाकी हल्ला चढवला. हल्लेखोरांजवळ लोखंडी रॉड होते. या हल्ल्यात धीरज शांतम गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर बुलडाण्यात उपचार सुरू आहेत. कर्जवसुली करून आणलेली पैशाची एक बॅग पंजाब थिगळे यांच्याजवळ होती, त्यामुळे पंजाब थिगळे यांनी दरोडेखोरांच्या तावडीतून निसटून जंगलात पळ काढला त्यामुळे दरोडेखोरांनी थिगळे यांचा पाठलाग केला आणि पैशाची बॅग आणि मोबाईल बळजबरीने हिसकावून दरोडेखोर अंधाराचा फायदा घेत पसार होण्यात यशस्वी झाले होते.परंतु फर्दापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे. पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे.पो.हे.बिटजमादर मिरखा तडवी सावळदबारा, पो.कॉ.भरत कोळी,पो.कॉ.आनंद पगारे,पो. कॉ.योगेश खडके, पो.कॉ.प्रदिप बेदरकर स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी ही मदत केली पि.एस आय विजय जाधव,स. पो.लहू थोटे,पो कॉल.श्रिमंत भालेराव,पो.हे.नरेद्र खंदारे,पो. ना.विजय धुमाळ यांनी घटनास्थळी धाव घेऊन जलद गतीने तपासाची चक्रे फिरवली आणि चार तासात सहा चोरट्यांना जेरबंद करण्यात आले आहे. एकुण सहा आरोपी १)संजय प्रभाकर खांडेकर (वय२२) रा. गोतमारा ता.जि.बुलढाणा, २) किरण अरूण सपकाळ (वय २५), ३)अक्षय उर्फ अमोल प्रभाकर जाधव (वय २९), ४) भरत बंशिलाल चव्हाण (वय २५) रा.देव्हारी. ता.सोयगाव, ५)शुभम बाळू सुरडकर( वय २२) या.टिटवी सोयगाव, ६)मुकेश संजय पवार (वय २१) रा.गोतमारा या.जि.बुलढाणा असे रात्रीच्या वेळी रस्त्यावर अडवून लुटमार करणाऱ्या चोरट्यांचे नावे आहेत.आजूक पुढील तपास सपोनि प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुग्रीव चाथे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा बिट जमादार मिरखॉ तडवी,पो. कॉ.भरत कोळी,पो.कॉ.आनंद पगारे,पो.कॉ.योगेश खडके,पो.कॉ. योगेश बिदरकर चोरट्यांचा कसून तपास करीत आहे.





# शिक्षकांच्या न्यायासाठी शिक्षक सेना रस्त्यावर; शिक्षक सेनेचे जि.प.समोर धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राज्य शासनाने परिपत्रक काडूनही अद्याप जिल्हाअंतर्गत विनंती बदल्या प्रक्रीया चालू केली नाही या मुख्य मागणीसह शिक्षकांच्या विविध मागणीसाठी शिक्षक सेनेच्या वतीने मंगळवार दि.11 जून रोजी एक दिवसीय धरणे आदोलन जि.प.नांदेड समोर राज्य ऊपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण व जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर यांच्या नेत्रत्वाखाली करण्यात आले. शासनाने परिपत्रक काडून शिक्षकांच्या विनंती बदल्या करा आदेशीत असतांना सुध्दा प्रक्रिया चालू केली नाही तसेच एक नोव्हेंबर 2005 पुर्वी जाहीरात निगालेल्या व नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन दिले जात नाही.

2006 पासून वरिष्ठ वेतन श्रेणी नाही, निवड श्रेणी नाही, महाराष्ट्र दर्शन नाही, केंद्रप्रमुख व विषय शिक्षकांच्या पदोन्नतीत अनियमिता,गेल्या दोन वर्षापासून गुरुगौरव पुरस्कार नाही,जी.पी.एफ स्लिप वेळेवर मिळत नाही,केंद्र प्रमुख प्रभारी नेमणूकात मनमानी,विस्तारधिकारी केंद्र प्रमुख यांची पदे तात्काळ भरण्यात यावी,आंतर जिल्हा बदलून आलेल्या शिक्षकांना ताबोड तोब एक वेतन वाढ द्यावी या मागणी आनेक प्रलंबीत मागण्यासाठी शिक्षक सेनेचे जि.प.समोर धरणे आंदोलन धरण्यात आले.या आंदोलनात राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, मराठवाड सहसंघटक विठ्ठल देशटवार, श्रीरंग बिराजदार, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, सचिव रवि बंडेवार सर, प्रा.परषुराम यसलवाड सर, गंगाधर कदम, मनोहर बंडेवार, प्रकाश कांबळे, अनिरुद्र शिरसाळकर, आविनास चिद्रावार, रविराज जाधव, मुस्तफा शेख, पांडूरंग कारामुंगे, कृषा माने, सचिन रामगीरवार, संजय मोरे, बालाजी भांगे, संभाजी पवार, लहू पंदलवाड, परषुराम मिरेवाड, संतोष घटकार,संतोष जोशी अंगद सुर्यवंशी, देविदास जमदाडे, पुरुषत्तोम मोतेवार, गोविंद आलेटवाड, गोविंद सुर्वनकार, नागनाथ देशपांडे,बालाजी राजुरवार, शंकर बल्लाळ, पांडूरंग, अंकलवार, इलीयास झुकलकर, मुजाहीत सर, महीला प्रतिनिधी सिमा पवार, सौ.पंचफुला वाघमारे मॅडम,स्विनी यमुनाबाई बिराजदार, सौ. वतनवकीम मॅडम, सौ.पठान मॅडम, सौ.ज्योती वाठोरे मॅडम, सौ.कार्ले मॅडम, सौ.डांगे मॅडमसह असंख्य शिक्षक सैनिक व शिक्षक ऊपस्थीत होते. आंदोलनाला शिवसेनेचे नांदेड जिल्हाचे सहसंपर्क प्रमुख दत्ता पा.कोकाटे व प्रकाशजी मारावार यांनी भेट देऊन शिक्षकांच्या प्रश्नासाठी आम्ही रस्त्यावर ऊतरु असे ठणकाऊन सांगितले. शिक्षक सेनेच्या वतीने दिवसभर घोषणा देण्यात आल्या व शेवटी आंदोलन स्थळी प्रशासनाचे मागण्याची कार्यवाही करत आसल्याचे लेखी ऊत्तर दिले.

# लोकसेवेचा आनंद हाच खरा ब्रह्मानंद : जिल्हाधिकारी

## जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शासनाची सेवा करतांना प्राप्त अधिकारांच्या आधारे सामान्य लोकांची कामे मार्गी लावून दिल्यास त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद कर्तव्यपूर्तीचे समाधान देतो. लोकसेवेतील हा आनंद हाच खरा ब्रह्मानंद आहे. आपण साऱ्यांनी उत्कृष्ट कामकाज करुन शासनाची प्रतिमा जनमानसात उंचवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागांचे अधिकारी व सर्व श्रेणीतील कर्मचारी यांचे प्रशिक्षण आज जिल्हा नियोजन सभागृहत पार पडले. 'प्रशासकीय कामकाज व संवाद कौशल्य', या विषयावर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, सुचिता शिंदे, प्रविण फुलारी, एकनाथ बंगाळे, रामदास दौंड तसेच सर्व विभागप्रमुख, कर्मचारी आदी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी स्वामी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९७१, त्यात असणाऱ्या सेवां संदर्भातील तरतूदी, सेवा हक्क अधिनियम, माहिती अधिकाराचा कायदा, वेळेचे महत्त्व व बंधन, सचोटी व कर्तव्यपरायणता, कार्यालयीन स्वच्छता, सहा गठ्ठे पद्धती, संचिकांची निंदणी, नस्ती लेखन, पत्रव्यवहार, प्रशासनतील कौशल्य, बैठकांचे आयोजन व इतिवृत्त लेखन अशा विविध बाबींविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपल्याकडे कामे घेऊन येणाऱ्या व्यक्तिच्या जागी स्वतः असल्याची कल्पना करुन त्या व्यक्तिशी कसे वागावे हे ठरवा. आलेल्या व्यक्तिशी किमान चांगले बोलणे, त्याचे म्हणणे ऐकून घेणे महत्त्वाचे आहे. कुणाचेही काम शक्यतो एकाच भेटीत व्हावे यासाठी त्यांना परिपूर्ण माहिती द्या. वारंवार चकरा मारायला लावू नका. आलेली पत्रे, निवेदने याची वेळीच दखल घेऊन त्यांना तात्काळ उत्तर द्या. चांगली वागणूक दिल्यास लोकांमध्ये शासनाविषयी चांगली प्रतिमा निर्माण होते. त्यामुळे प्रशासकीय कामकाज करतांना लोकांशी उत्तम संवाद ठेवणे हे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.
प्रास्ताविक विनोद खिरोळकर यांनी तर आभार प्रदर्शन एकनाथ बंगाळे यांनी केले.



# सोयगाव येथे वीर महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील बसस्थानक परिसरातील सुप्रसिद्ध गोपाल डेअरी येथे महाराणा प्रताप जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख दिलीप मचे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर विजय पगारे, सुभाष काळे, शिवसेना शहरप्रमुख रविंद्र काटोले, दिलीप शिंदे, बबन रोकडे, गणेश कापरे, नगरसेवक राजू दुतोंडे, रामा एलीस, दिपक बागुल, गोकुळ परदेशी, पंकज परदेशी, विजय पगारे, अमोल निकम, श्याम पाटील, एकनाथ गोंड, दिलीप शिंदे, गजानन पेंदोर, विठ्ठल कळंत्रे, रवी जाधव, दिगंबर नेताम, राजू दुतोडे, राजू पाटील, दत्तू काटोले, नितीन सोनवणे, सतीष नेरपगारे मोठ्या संख्येने उपस्थित होते.अशी माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सोयगाव शहर प्रमुख दिलीप मचे यांनी बोलताना दिली.

# सोलापुरात हायप्रोफाईल डॉ. सूरजला बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** सांगोला येथील डॉक्टर ऋचा सुरज रुपनर यांच्या आत्महत्येप्रकरणी अखेर माझाच्या दणक्यानंतर मुख्यमंत्री शिंदे गटातील नेते व उद्योगपती भाऊसाहेब रुपनर यांना यांना रात्री उशिरा सांगोला पोलिसांनी (POLICE) कोल्हापूर येथून अटक केली आहे. ABP माझाने ही वस्तुस्थिती दाखवल्यानंतर पोलीस खडबडून जागे झाले आहेत. वरिष्ठांकडून चौकशा सुरू झाल्यावर पोलिसांनी झटपट कारवाईला सुरुवात केली. कोल्हापूर (KOLHAPUR) येथून सासरे उद्योगपती भाऊसाहेब रुपनर यांना अटक करण्यात आली. तर, आत्महत्येसाठी जबाबदार असणारा पती डॉ. सुरज रुपनर यालाही पोलसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्या अटकेसाठी विविध ठिकाणी टीम पाठवण्यात आल्या होत्या. पोलिसांवर कोणताही दबाव नसल्याचा दावा देखील पंढरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी एबीपी माझाशी बोलताना केला होता. त्यानंतर, आज डॉक्टरला सूरजला अटक करण्यात आली. सांगोल्यातील हाय प्रोफाईल महिला डॉक्टर ऋचा हिच्या आत्महत्येस कारणीभूत असलेला पती डॉ. सूरज रुपनरला अखेर सांगोला मिरज रोडवरील नाझरे टोल नाक्यावरुन पोलिसांनी ताब्यात घेतले. थोड्याच वेळात पोलीस आरोपी सूरजला घेऊन पोहोचणार आहेत. गेल्या सहा दिवसांपासून सूरज हा पोलिसांना चकवा देत होता. अखेर काल रात्री उद्योगपती वडील भावुसहेब रुपनर यांना अटक केल्यानंतर आता फरार असलेला सूरज पोलिसांच्या तावडीत सापडला आहे. उच्चशिक्षित असणाऱ्या डॉ. ऋचा रुपनर हिने व्याभिचारी पतीच्या शारिरिक व मानसिक ताणाला कंटाळून 6 जून रोजी पहाटे सांगोला येथील राहत्या घरी आत्महत्या केली होती. या आत्महत्येनंतर पोलिसांकडून अतिशय संथगतीने तपास केला जात असून राजकीय दबाव व पैशाचा वापर करुन केस दाबण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा कुटुंबाचा आरोप होता. या घटनेला 6 दिवस उलटूनही डॉ. ऋचा हिच्या फरारी पतीस पोलिसांनी अटक न केल्याने सोशल मीडियावर डॉ. ऋचा हिला न्याय मिळवून देण्यासाठी मोहिम राबविली जात होती. विशेष म्हणजे एबीपी माझानेही हे वृत्त लावून धरले होते.
संतप्त डॉक्टरांनी काल रात्री सांगोला पोलीस ठाण्यात जाऊन या प्रकारचा जाब विचारला. मात्र, पोलिसांकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने डॉक्टरांनी पोलीस ठाण्यातच जोरदार आंदोलन सुरु केले होते. अखेर काल रात्री या प्रकरणातील पुरवणी फिर्याद घेऊन डॉ. ऋचा हिचे सासरे भाऊसाहेब व सासू सुरेखा रुपनर हिच्यावर गुन्हा दाखल झाला. त्यानंतर आरोपींना तातडीने अटक करा म्हणून सर्व डॉक्टर पोलीस ठाण्यात थांबून राहिल्यावर अखेर कोल्हापूर येथून सासरे भाऊसाहेब रुपनर यांना ताब्यात घेऊन त्यांना अटक करण्यात आली. भाऊसाहेब रुपनर हे फॅबटेक उद्योग समूहाचे सर्वेसर्वा असून त्यांचे प्रस्थ बरेच मोठे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ते नेते असून सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांचे ते निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. दरम्यान, अजूनही पोलिसांच्या तपासाबाबत जनतेत शंका असून मृत डॉ.ऋचा हिचा मोबाईल ताब्यात घेणे असेल किंवा इतर गोष्टी पोलिसांकडून होत नसल्याचे पीडित कुटुंबीयांचे सांगणे आहे. पोलिसांवरील वाढता दबाव लक्षात घेऊन अखेर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास आरोपी भाऊसाहेब रुपनर यांना कोल्हापूरहून सांगोला पोलिसांनी मागील दारातून आणून अटक केली.

# तलाठी अभावी अंढेरा येथील शेतकरी त्रस्त; कायमस्वरूपी तलाठी देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तलाठी यांची मंडळ अधिकारीपदी बढती झाल्याने अंढेरा येथील वित्त जागेवर प्रभारी तलाठी देण्यात आल्याने त्या भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे.पेरणीची कामे सुरू झाल्याने तलाठी अभावी शेतकऱ्यांची कामे खोळंबली असून अंढेरा येथे दोन्ही तलाठी कायमस्वरूपी पदभार द्यावा, अशी मागणी होत आहे. तालुक्यातील अंढेरा येथील भाग १ व भाग २ असे दोन तलाठी कार्यरत असतात, या ठिकाणी असलेले तलाठी विनोद डोईफोडे यांची मंडळाधिकारी म्हणुन पदोन्नती झाली सर दुसरे तलाठी श्री.चव्हाण हे सेवानिवृत्त झाल्याने दोन्ही पदे रिक्त झाली. दरम्यान या रिक्त जागेवर धोत्रा नंदाई येथील तलाठी मंजिरी सोनवणे यांना अंढेरा भाग १ व शिवणी अरमाळ रूपाली अंजनकर यांना भाग २ तलाठी पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला. या दोन्ही तलाठी अतिरिक्त प्रभार असल्याने अंढेरा येथे उपस्थित राहत नाही, त्यातच मंजिरी सोनवणे ह्या गत ६ जून पासून आजारी रजेवर आहेत.अंढेरा येथील भाग १ व भाग २ ला अतिरिक्त प्रभार असलेले तलाठी देण्यात आल्याने तसेच एक तलाठी देऊळगाव मही येथून काम पाहत असून एका भागाचा कामचलावू कारभार कोतवाल पाहत आहे.म्हसूल विभागा च्या ह्या दुर्लक्षित कारभारा मुळे शेतकरी, निराधार वयोवृद्ध महिला,ज्येष्ठ नागरिक,व विद्यार्थी यांची फरकट होत आहे. अंढेरा येथे दोन्ही ठिकाणी कायम प्रभार असलेले तलाठी देण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

# दिव्यांग व्यक्तींच्या स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना; इच्छुकांकडून अर्ज मागविले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दिव्यांग व्यक्तिंना स्वयंरोजगारासाठी उद्योग व्यवसाय करता यावा यासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षाकरीता या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक व पात्र दिव्यांग व्यक्तिंकडून ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.इच्छुक व पात्र दिव्यांग व्यक्तिंनी दि.२२ जुलै पर्यंत आपले अर्ज सादर करावे असे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत यांनी केले आहे.
या योजनेअंतर्गत बॅंकेमार्फत दीड लाख रुपये कर्ज मंजूर केले जाते. त्यानंतर समाज कल्याण विभागामार्फत २० टक्के सबसिडी दिली जाते. पात्र लाभार्थी- दिव्यांग प्रवर्गातील अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग. बौद्धिक अक्षम प्रवर्गातील दिव्यांगास अर्ज करता येणार नाही. पात्र लाभार्थ्याचे वय १८ ते ५० वर्ष या दरम्यान असावे. तहसिलदारांनी दिलेले मार्च २०२५ पर्यंत वैध असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, बेरोजगार प्रमाणपत्र, ठराविक व्यवसायासाठीचे ना हरकत प्रमाणपत्र, रेशन कार्ड, मतदान कार्ड, आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र (UDID) ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक, दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे कोटेशन, प्रकल्प अहवाल, जागे संदर्भात भाडे करार, पावती, मालकी हक्क पुरावे इ. जोडावे.
सर्व कागदपत्रे जोडून आपले अर्ज जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे दि.२२ जुलै पर्यंत जमा करावे, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत यांनी केले आहे.

# झोक्यात झोपलेली चिमुकली पत्रासह उडाली

## देऊळगाव घुबे येथे दुर्दैवी घटनेत सईचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** 11 जून रोजी सायंकाळी तुफान वादळी वाऱ्यासह पावसाला जोरदार सुरुवात झाल्यामुळे तसेच अनेक घरांवरील टीनपत्रे अक्षरक्षः उडाली. परंतु त्यामध्ये घरात झोक्यात झोपलेल्या 6 वर्षाच्या चिमुकलीचा झोका लोखंडी अँगलसह हवेत उडाल्यामुळे या घटनेत चिमुकलीचा आदळून जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना येथून काही अंतरावर असलेल्या ग्राम देऊळगांव घुबे येथे घडली.
अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या देऊळगाव घुबे ता. चिखली येथे रात्री नऊ वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. त्यामध्ये हवेचा जोर इतका भयानक होता की मोठ मोठी झाडे, घरवरचे टिन अचानक उडायला सुरवात झाली. त्यामुळे विज वितरण विभागाने विद्युत पुरवठा खंडित केला. त्यामुळे गावकरी जीव मुठीत धरून आपापल्या घरात बसले होते. त्यामध्ये गावातील भरत साखरे यांची सई नाव असलेली चिमुकली घरात लोखंडी अँगलला बांधलेल्या झोक्यात झोपली होती. घरातील इतर सदस्य जेवायला बसणार तेवढ्यात वाऱ्याने घरावरील टिनपत्रे लोखंडी अँगल आणि बांधलेल्या झोक्यासह हवेत उडाली. हवेत उडालेला झोका घरा पाडून दोनशे फूट अंतरावर जावून आदळला. त्यामध्ये झोक्यातील चिमुकली जमिनीवर आदळून तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलीस प्रशासन, तहसील विभागाला मिळताच तात्काळ घटनास्थळी मोठया संख्येने कर्मचारी व गावकरी उपस्थितीत होवून पंचनामा केला. गावकऱ्यांनी तातडीने चिमुकलीला दवाखान्यात घेवून गेले मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेने परिसरात एकच शोककळा पसरली आहे.

# महाभ्रष्टयुती सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करा

## नाना पटोले : पिचलेल्या शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफ करा, बी-बियाणे व खते मोफत पुरवा

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** राज्यातील जनता दुष्काळात होरपळून निघत असताना महायुती सरकारला त्याचे गांभीर्य नाही. लोकसभा निवडणुकीवेळी राज्यात २६७ शेतकरी आत्महत्या झाल्या आणि निवडणुकीनंतरही या आत्महत्या कमी झालेल्या नाहीत. DBT च्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरवल्या जाणारी खते, बियाणे, औषधे दिलेली नाहीत. टेंडर न काढताच मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने अव्वाच्या सव्वा किंमत वाढवून कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात आली, याला विरोध करणाऱ्या कृषी आयुक्तांना बाजूला करण्यात आले. सरकारने राज्यात टँकर माफिया तयार केले आहेत. ही सर्व परिस्थीती पाहता भ्रष्टाचारात बरबटलेल्या महायुती सरकारला सत्तेतून बाहेर काढून राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी केल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन दुष्काळ व राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा केली. या शिष्टमंडळात प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री यशोमती ठाकूर, खा. शोभा बच्छाव, खा. वसंतराव चव्हाण, खा. बळवंत वानखेडे, आ. मोहन हंबर्डे, आ.वजाहत मिर्झा, आ. धीरज लिंगाडे, आमदार माधवराव पाटील जवळगावकर, माजी आ. विरेंद्र जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड, NSUI चे प्रदेशाध्यक्ष अमिर शेख, प्रदेश सरचिटणीस मुनाफ हकीम, राजेश शर्मा, रमेश शेट्टी, रमेश कीर, प्रमोद मोरे, सचिव झिशान अहमद, अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिरुध्द ऊर्फ बब्लू देशमुख, अकोल्याचे प्रमोद डोंगरे, संदीप पांडे, आकाश जाधव, डॉ. गजानन देसाई, धनराज राठोड, मदन जाधव आदी उपस्थित होते.

राज्यपाल यांना भेटल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना सरकार सुट्टीवर गेले होते तर काही मंत्री परदेशात गेले होते. मंत्र्यांना परदेशात जाण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते. या मंत्र्यांनी कोणाची परवानगी घेतली होती, ह्याचा खुलासा झाला पाहिजे. शेतकरी संकटात सापडलेल्या आहे, त्याला आधाराची गरज आहे. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी द्यावी, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ४ लाख रुपये द्यावेत अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात व पिण्याच्या पाण्याची सोय करावी. राज्यात खतांचा काळाबाजार सुरु आहे. खरीपाच्या पेरणीसाठी खते आणि बियाणे सरकारने पुरवावे अशी मागणी करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले हे आमचे दैवत आहेत. संसद परिसरात असलेल्या या दैवतांचे पुतळे भाजपा सरकारने काढले आहेत, त्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला व मा. राष्ट्रपती महोदय यांना आमच्या भावना कळवा. आमच्या महापुरुषांचा अपमान सहन केला जाणार नाही असेही नाना पटोले यावेळी म्हणाले.

महामहिम राज्यपाल यांच्या भेटीदरम्यान पवईतील भीमनगर झोपडपट्टीवर करण्यात आलेल्या नियमबाह्य कारवाईचा मुद्दाही मांडण्यात आला. हिरानंदानी या बिल्डरसाठी सरकारने गरिबांना बेघर केले आहे. सरकार, प्रशासन व बिल्डराच्या संगनमताने ही कारवाई करण्यात आली आहे. पावसाळ्यात अशी कारवाई करू नये असा नियम आहे, सर्वोच्च न्यायालयाचेही तसे निर्देश आहेत असे असतानाही कारवाई करण्यात आली असे नाना पटोले म्हणाले.

यासंदर्भात बोलताना प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान म्हणाले की, भीमनगरमध्ये तीन पिढ्यांपासून रहात असलेल्या या लोकांवर ६ जून रोजी पोलीसांनी जबरदस्तीने घरात घुसून लोकांना मारहाण केली व बाहेर काढले, यात महिला, वरिष्ठ नागरिक, लहान मुले यांनाही मारहाण करण्यात आली. महानगरपालिकेचे अधिकारी व पवई पोलीस स्टेशनचे अधिकारी यांनी एका बिल्डरसाठी तीन पिढ्या रहात असलेल्या जवळपास ६५० कुटुंबांना बेघर केले. या सर्व कुटुंबाचे त्याच जागी पूनर्वसन करावे, त्यांना नुकसान भरपाई द्यावी तसेच नियमबाह्य कारवाई केलेल्या मुजोर मनपा अधिकारी, पोलीस व बिल्डरवर एससी, एसटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत व त्यांना निलंबत करावे. या संपूर्ण घटनेची मा. उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश यांच्यामार्फत चौकशी करावी अशी मागणीही यावेळी राज्यपाल महोदय यांच्याकडे करण्यात आली.

# मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकपदे संपवणारा निर्णय रद्द करा

## मुख्यमंत्र्यांनी दिले कार्यवाहीचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ शेड्युल मधील विद्यार्थी शिक्षक प्रमाणाची अंमलबजावणी न करणारा सुधारित संच मान्यता निकष शासन निर्णय १५ मार्च २०२४ शालेय शिक्षण क्रीडा विभाग, तात्काळ रद्द करण्याची मागणी जनता शिक्षक महासंघाचे राज्य सचिव अनिल शिवणकर यांच्या नेतृत्वात निवेदनाद्वारे मा.उल्हास नरड, शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग यांच्यामार्फत शासनाला करण्यात आली आहे

संच मान्यतेच्या नवीन निकषांमध्ये माध्यमिक शाळेत आधी इयत्ता पाचवी करिता ३१ विद्यार्थ्यांवर दोन शिक्षक अनुज्ञेय होते परंतु सुधारित निकषानुसार ४६ विद्यार्थ्यांवर दोन शिक्षक अनुज्ञेय होणार आहेत.आधी सहा ते आठ गटाकरिता ३६ विद्यार्थ्यांवर तीन शिक्षक अनुज्ञेय होते परंतु आता ६० विद्यार्थ्यांवर तीन शिक्षक अनुज्ञेय होणार आहे. आधी इयत्ता नववी व दहावीच्या दोन्ही वर्गाच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४० असल्यास तीन शिक्षक अनुज्ञेय होते परंतु आता मात्र इयत्ता नववी व दहावी करिता प्रत्येकी २० विद्यार्थ्यांची अट टाकून ४० ते १०० विद्यार्थ्यांपर्यंत तीन शिक्षक अनुज्ञेय होणार आहेत. आधी माध्यमिक शाळेची पटसंख्या १०० असल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होते परंतु आता १५० विद्यार्थी असल्यास मुख्याध्यापकाचे पद, शाळेत ३१ शिक्षक असतील तरच उपमुख्याध्यापकाचे पद, १६शिक्षक असतील तरच पर्यवेक्षकाचे पद अनुज्ञेय होईल. नवीन निकषांमध्ये कला, क्रीडा ,संगीत व कार्यानुभव या विशेष शिक्षकांची अनुज्ञेयता सहा ते आठ व नऊ ते दहा ला मंजूर होणाऱ्या शिक्षकांमध्येच समाविष्ट करण्यात आली आहे त्यामुळे विशेष शिक्षकांचे अस्तित्वही संपणार आहेत. सुधारित संच मान्यतेच्या निकषांमुळे शिक्षकांची संख्या कमी होऊन विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होणार आहे, सदर शासन निर्णयाने मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक पदाचे अस्तित्व धोक्यात आले आहे हे बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 चे उल्लंघन करणारे असून महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळांचे अस्तित्व संपुष्टात आणणारे आहे असे मत अनिल शिवणकर यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केले असून शासन निर्णयातील संच मान्यतेचे सुधारित निकष तात्काळ रद्द करून महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळांचे अस्तित्व सदैव कायम राहतील व विद्यार्थी शिक्षक प्रमाण योग्य राहतील असे निकष निर्गमित करण्याची मागणी शासनाला केली आहे. निवेदन देतेवेळी अनिल शिवणकर,सुधीर अनवाणे ,नरेश कामडे ,हरीश केवटे ,अशोक हजारे ,प्रदीप बिबटे, माधुरी सराडकर, मोहन भेलकर ,कपिल उमाळे, सविता मोटघरे, मोनिका वारोटकर, मोहनिष राऊत,ओंकार श्रीखंडे,विशाल चव्हाण,श्रीवंत शेंडे,बंडू कुबडे,कविता वारोकर,विपुल राऊत,छाया मेहेत्रे, विनोद ढोबळे ,प्रशांत राऊत आदी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खते बियाणांचा साठा, विक्री कोटा खुले करा; आम आदमीचे कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**देऊळगाव राजा :** बी बियाणे व रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट करण्यात येत आहे. यावर उपाय म्हणून कृषी केंद्र चालकांच्या दुकान व गोडाऊन मध्ये शिल्लक असलेले रासायनिक खते व बी बियाणांचा साठा विक्री कोटा खुले करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी आम आदमी पार्टीने तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. सद्यस्थितीत खरीप हंगामाची लगबग सुरू झाली असून बी बियाणे खरेदीसाठी शेतकरी कृषी केंद्राकडे वळला आहे. मात्र कृषी केंद्रचालक विशिष्ट बियाणांचा तुटवडा असल्याचे सांगत आहे. दरम्यान तालुक्यातील बहुतांश कृषी केंद्र चालक कापूस बियाणांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांना ज्यादा दराने बियाणे विक्री करीत आहे. तालुका कृषी अधिकारी पंचायत समिती यांनी या गैरप्रकारची दखल घेत तालुक्यातील कृषी केंद्रावर उपलब्ध साठा व दराबाबत माहिती ग्रामस्थळावर कृषी सहाय्यक मार्फत शेतकऱ्यांच्या व्हाट्सअप ग्रुप वर खुले करण्यात यावे. तसेच कृषी केंद्रावर तसा फलक लावण्यात यावा अशी मागणी आम आदमी पार्टीचे नेते राजाराम खांडेभराड व शहराध्यक्ष मंगेश तिडके यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. कापूस बियाणांसह इतर बी बियाण्यांबद्दल कृषी केंद्र चालकाकडून शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक व मानसिक शोषण थांबविण्यात आले नाही तसेच बियाणांचा साठा विक्री कोटा खुले करण्यात आलं नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आम आदमी ने दिला आहे.

# गद्दारी करणाऱ्यांना सोडणार नाही : चिखलीकर

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षासह महायुतीला फारसं यश मिळवता आलं नाही. ४८ मतदारसंघापैकी महायुतीला फक्त १७ जागा मिळाल्या. त्यामुळे महाराष्ट्रात महायुतीला धक्का बसला. लोकसभा निवडणुकीत नांदेड लोकसभा मतदारसंघ चांगलाच चर्चेत होता. कारण लोकसभा निवडणुकीआधी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर अशोक चव्हाणांना भाजपाने राज्यसभेवर पाठवलं. त्यामुळे नांदेड लोकसभेची जागा भाजपा मोठ्या मताधिक्यांने जिंकेल अशी चर्चा होती. मात्र, लोकसभा निवडणुकीत भाजपाचे नांदेडचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांचा मोठ्या मताधिक्यांनी पराभव झाला. तर काँग्रेसचे उमेदवार वसंत चव्हाण यांचा विजय झाला.

या पराभवासंदर्भात बोलताना प्रताप पाटील चिखलीकर यांनी आता सूचक विधान केले आहे. 'पात्रता नसणाऱ्यांना पक्षाने मोठं केलं. मात्र, त्यांनी पक्षाबरोबर गद्दारी केली. पण त्यांना सोडणार नाही', असा थेट इशारा नाव न घेता प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिला. त्यामुळे चिखलीकर यांच्या या विधानाचा रोख नेमकं कुणाकडे आहे? याबाबत आता तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. आपण लोकसभेला अतिशय प्रामाणिकपणे काम केलं. एकाही कार्यकर्त्यांच्या संदर्भात माझी वैयक्तिक तक्रार नाही. मात्र, कारणं खूप वेगळी आहेत. अशोक चव्हाण यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश झाला. त्यावेळी काय चर्चा होती? नांदेडची जागा दोन लाखांनी निवडून येईन. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी अशोक चव्हाण आणि अजित गोपछडे यांना राज्यसभेवर घेण्यात आलं. त्यानंतर असं वाटलं की आपलं लीड आणखी वाढेल. पण ही फक्त आपली एक भावना होती", असं प्रताप पाटील चिखलीकर यांनी म्हटलं. ते पुढं म्हणाले, "यामध्ये असं झालं की नगरपालिका आणि महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्षांच्या जुन्हा कार्यकर्त्यांना असे वाटले की अशोक चव्हाण यांच्याबरोबर आलेले लोक आपल्या छातीवर बसतील. मग आपण काम करून काय फायदा? त्यामुळे कदाचित त्यांनी काम केलं नसावे. तसेच अशोक चव्हाण यांच्याबरोबर आलेल्या कार्यकर्त्यांना वाटलं असेल की आपलं काही नाही. आपण तर आत्ताच आलो आहोत. यामध्ये नांदेडमध्ये लोकसभेला कमी मतदान झाले, असे माझे मत आहे, असे प्रताप पाटील चिखलीकर यांनी म्हणाले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# खतसाठ्याची उचल केल्यानंतर आवश्यकता असल्यास कृषी विभागाने अतिरिक्त साठा मंजूर करावा : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात काही ठिकाणी चांगला पाऊस पडला असून शेतकऱ्यांनी पेरणीच्या पूर्वतयारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे राज्यात बी-बियाणे आणि खतांच्या मागणीत वाढ होत आहे. शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांचा पुरेसा पुरवठा केला जात असला तरी येणाऱ्या काळात खतांचा तुटवडा जाणवू नये यासाठी राज्य शासनातर्फे खतांचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) करण्यात येतो. पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार व प्राप्त उद्दिष्टानुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची संपूर्ण उचल करावी. तसेच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागाने पणन महासंघास अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज पणन महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक घेतली. या बैठकीस कृषी मंत्री धनंजय मुंडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम, संचालक पांडुरंग घुगे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार व पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनुपकुमार, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंह, पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे-पाटील, नाफेडच्या व्यवस्थापक भाव्या आनंद आदी उपस्थित होते.




उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पणन महासंघाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी चांगले काम केले आहे. महासंघाने आपल्या कामात आणखी सुधारणा करून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, यासाठी शासनातर्फे महासंघाला अधिक सहकार्य करण्यात येईल. राज्यात जिल्हा पणन कार्यालयांच्या माध्यमातून ग्रामीण सहकारी संस्थांच्या मदतीने गावपातळीपर्यंतच्या शेतकऱ्यांना वाजवी दरात खतांचे वितरण करण्यात येते. यामुळे पणन महासंघाअंतर्गत काम करणाऱ्या सहकारी संस्थांच्या उत्पन्नात वाढ होण्यासही मदत होते. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने पणन महासंघास आवश्यकतेनुसार व प्राप्त उद्दिष्टानुसार संरक्षित खतसाठा वितरित करावा. धान खरेदीसाठी आवश्यक असणारा बारदाणा पूर्वीप्रमाणे महासंघामार्फत खरेदीसाठी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही केली जावी. केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दराने आणि त्यांच्या पॅनेलवरील पुरवठादारांकडून बारदाण खरेदीसाठी महासंघाने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

शालेय पोषण आहार योजनेत पणन महासंघ निविदा प्रक्रियेद्वारे नियमानुसार सहभागी होऊ शकतो. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून चना व तूर विक्री तसेच अनुषंगिक खर्चापोटी आणि धान व भरड धान्य खरेदी पोटी अनुषंगिक खर्चाची प्रलंबित रक्कम मिळण्याबाबत शासन स्तरावर नियमाप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. याबाबत लवकर तोडगा काढण्यासाठी मुख्य सचिवांनी बैठक घेऊन योग्य शिफारशी कराव्यात. नाफेड अंतर्गत खरेदी केलेल्या कडधान्य वाहतूक रकमेबाबतीतही गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना दिले.

पणन महासंघाच्या कृषी, पणन आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाकडील अन्य मागण्यांवर देखील सकारात्मक चर्चा झाली. याबाबतीतही वेगाने निर्णय घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले. अन्न व नागरी पुरवठा विभागाने त्यांच्या सचिवांच्या स्तरावर बैठक घेऊन पणन महासंघाने मागणी केलेल्या प्रलंबित रकमेबाबत अहवाल द्यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मोदी सरकार म्हणजे बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी : नाना पटोले यांचा टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मोदी सरकार म्हणजे बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी असल्यासारखे आहे. देशाला एकच माणूस संभाळू शकतो, अशी वल्गना केली जात होती. मात्र लोकसभा निवडणुकांचे जे निकाल आले त्यात काय झाले त्याचे, या घटनेला जबाबदार केंद्र सरकार आहे. अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. डोंबिवलीतील एमआयडीसीमधील इंडो अमाईन्स कंपनीत आज आग लागल्याची घटना घडली आहे. यावेळी अनेक स्फोटांचे आवाजही येत असल्याची माहिती समोर येत आहे. सतत घडणाऱ्या या घटनेमुळे रहिवाशांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. आग लागण्याचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नसलं तरी या आगीचे लोळ पाहून परिसरात राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे.यावरून नाना पटोले यांनी सरकारवर निशाणा साधत टीका केली आहे. खऱ्या अर्थाने हे सरकारचं अपयश आहे. वारंवार तिथे या घटना होतं आहेत. अनधिकृत कंपन्यांचं ऑडीट करून त्यांना परवानगी द्यावी. मूळात सरकारचं अशा अनधिकृत गोष्टींना पाठींबा असल्याने या चुकीच्या गोष्टी घडत



आहेत. सरकारचं याला कारणीभूत आहे. असे म्हणत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी डोंबिवलीतील आजच्या घटनेसाठी सरकारला जबाबदार ठरवले आहे. देशात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुका आणि त्यांच्या निकालानंतर संघ नेतृत्वाची जाहीर भूमिका पहिल्यांदाच सर्वांसमोर आली. संघाच्या प्रशिक्षण प्रणालीत अत्यंत महत्वाच्या कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोपीय सोहळ्यात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी फक्त काँग्रेस किंवा इंडी आघाडीच्या पक्षांनाच धारेवर धरले नाही, तर भाजप आणि पंतप्रधान मोदी यांना ही जोरदार कानपिचक्या दिल्या आहेत. याविषयी बोलतांना नाना पटोले म्हणाले कि, संघ का सल्ले देत आहे? भाजपचे नेते म्हणत आहेत की संघाला आम्ही माणत नाही. असे ते स्पष्ट सांगत असताना संघ का सल्ले देत आहेत. अर्थात त्यांच्या पक्षाबाबत मी जास्त बोलणे योग्य नाही, असेही नाना पटोले म्हणाले. दरम्यान, संजय राऊत यांनी केलेल्या टीकेला नाना पटोले यांनी उत्तर दिले नाही. त्यांनी सांगितले मी कोणावरही टीकेला उत्तर देणार नाही. मी कामात लक्ष देतो त्यामुळे तुम्हाला आता रिझल्ट दिसत आहे. कोणाच्या सर्टिफिकेटची मला गरज नसल्याचे नाना पेटोले म्हणाले. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेला जागावाटपात वर खाली होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

# केबल, डीपी चोरी, अवैध धंद्यांविरोधात पोलीस, महावितरणची संयुक्त बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** लोकसंख्येच्या दृष्टीने अत्यंत मोठे गाव असलेल्या शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई व परिसरात सातत्याने होणाऱ्या विजेच्या डीपी चोऱ्या व परिसरात बोकाळलेले अवैध धंद्यांच्या पार्श्वभूमीवर आज येथील ग्रामपंचायतीच्या श्री येमाई माता सभागृहातदुपारी ३ ते साडेचार वाजेपर्यंत बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीस शिरूरचे पोलीस उपनिरीक्षक ज्योतीराम गुंजवटे,उपनिरीक्षक सुनील उगले, त्यांचे पोलीस सहकारी कर्मचारी,महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सुमित जाधव,शाखा अभियंता इंगळे व त्यांचे कर्मचारी, निरगुडसरचे माजी सरपंच तथा राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे प्रतिनिधी म्हणून रामदास वळसे पाटील, कवठे येथील अनेक ग्रामपंचायत सद्स्य,ग्रामस्थ उपस्थित होते. कवठे येमाई परिसरात वाढत्या डीपी,केबल चोऱ्या अवैध धंद्यांच्या पार्श्वभूमीवर पोलीस,महावितरण अधिकाऱ्यांच्या बैठकीत विविध प्रतिबंधात्मक उपाय योजनाआखण्यात आल्या असून गावोगावी ग्रामसुरक्षा दल तात्काळ सक्रिय करण्यात येणार आहेत.

परीसरात चालू असलेल्या अवैध धंद्यांवर आता कडक व धडक कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक गुंजवटे यांनी सांगितले.बैठकीस उपस्थित असणारे रामदास वळसे पाटील यांनी कवठे येथील अवैध दारू धंद्यांबाबत एक्ईसाज विभागाचे पुणे विभाग अधिकारी रजपूत यांच्याशी थेट संपर्क साधत येथील वस्तुस्थितीची त्यांना माहीती दिली. तर पोलिस व महावितरण यांची संयुक्त पथके स्थापन करण्यात येत असून ग्रामसुरक्षा पथकाच्या मदतीने ट्रान्स्फार्मर चोऱ्या रोखण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सुमित जाधव यांनी सांगितले.तर गाव व परिसरात जोरदार पणे सुरु असलेल्या अवैध धंद्यांबाबत उपस्थितांसमोर प्रश्नांची खैरात केली. यावर तात्काळ योग्य त्या उपाय योजना करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्याने हि बैठक संपन्न झाली.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर